# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ / अग्रहायण ६, १९४० ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९०**

---

### पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या कार्यालयाची समाजकंटकांनी केलेली तोडफोड

**(१) * १२८२८५ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या कार्यालयात जाऊन काही समाजकंटकांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास कार्यालयाची तोडफोड केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यालयातील साहित्याची तोडफोड करणाऱ्या व कायदा हातात घेणाऱ्या तसेच राज्यघटनेचा अवमान करणाऱ्या समाजकंटकांविरुध्द कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन संबंधित लोकप्रतिनिधींनी तहसिलदार, अकोले यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून कार्यालयाची तोडफोड करणाऱ्या किती समाजकंटकांना पोलिसांनी अटक केली त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या कार्यालयात शिरून काही समाजकंटकांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी केलेल्या कार्यालयाची तोडफोड प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.८९/२०१८ भा.दं.वि. कलम ४५३, ३५३, ३४१, ४२७, ३४ ब सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम क. ३ व ४ प्रमाणे दोन व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला जामीन मंजूर करण्यात आला असून एका आरोपीने मा.मुंबई उच्च न्यायालयात अटकपुर्व जामिनाकरिता याचिका दाखल केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रभादेवी (मुंबई) येथील जानकी भुवन, हातिसकर वाडीच्या पुनर्विकासात विकासकाने रहिवाशांची केलेली फसवणूक

**(२) * १३२५८० श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रभादेवी (मुंबई) येथील जानकी भुवन, हातिसकर वाडी येथील पुनर्विकासाकरिता विकासकाला म्हाडातर्फे दिनांक ०६ मे, १९९२ रोजी वा त्या सुमारास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत २५ वर्षांपासून ४० कुटुंबे संक्रमण शिबिरात राहत असून सदर संक्रमण शिबीर महानगरपालिकेने धोकादायक ठरवून वीज व पाणी खंडित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत २५ वर्षांपासून रहिवाश्यांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर शासनाकडून फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याबाबत तसेच उक्त प्रकल्प त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या उपलब्ध अभिलेखावरुन मुंबई महानगरपालिकेतर्फे सेक्शन ३४२ व ३४७ अन्वये दि.०१.०७.२०१५ व दि.११.०८.२०१५ रोजीच्या पत्रानुसार विकासक “मेसर्स जानकी प्रॉपर्टीज” यांना नोटीस बजावली आहे. तथापि म्हाडाने केलेल्या प्रत्यक्ष पाहणीअंती संक्रमण शिबीरात रहिवाशी वास्तव्यास असुन त्यांचे पाणी व विद्‌युत पुरवठा सुरु आहे.

(३) अशाच प्रकारच्या बंद पडलेल्या पुनर्विकास प्रकल्पासाठी शासन स्तरावर धोरण निश्चित करण्यासाठी म्हाडाकडून शासनास प्राप्त झालेला प्रस्ताव व तसेच शासनाने दि.२९.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या ८ विधीमंडळ संदस्यांच्या समितीच्या अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने बंद पडलेल्या प्रकल्प म्हाडामार्फत पूर्ण करण्यासाठी म्हाड अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भानगांव (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर) येथे एका आदिवासी महिलेचा केलेला विनयभंग

**(३) * १२६६७२ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भानगांव (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर) येथे दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास एका आदिवासी महिलेला विवस्त्र करुन मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला श्रीगोंदा पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यास गेली असता पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर येथे गु.र.नं. ४६०/२०१८ भा.द.वि. का. कलम १४७, १४८, १४९, ३५४, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ५०९, ३४, अनुसूचित जाती जमाती कायदा कलम ३(१)(W)(i), ३(१)(W)(२), ३(२)(v)(a), ३(१)(e) प्रमाणे ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मा. सत्र न्यायालय, अहमदनगर यांनी आरोपी क्र.१ ते ५ यांचा अटकपुर्व जामीन मंजुर केलेला आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

पोलीस अधिका-यांनी केलेल्या कसुरीबाबत त्यांची देय वेतनवाढ ३ वर्षाकरीता स्थगित करण्याबाबत पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांना शिफारस करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील (जि.पालघर) नालासोपारा पूर्वेकडील तुळींज येथील सर्व्हे क्र.९९, हिस्सा नं.३ या जागेवर सिध्दीविनायक अपार्टमेंट बेकायदेशीररित्या उभारण्यात आल्याबाबत

**(४) * १२६५२० श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा पूर्वेकडील तुळींज येथील सर्व्हे क्र.९९, हिस्सा नं. ३ या जागेवर तळमजला अधिक तीन मजले असलेली सिध्दीविनायक अपार्टमेंट इमारत बेकायदेशीररित्या उभारण्याकरीता बोगस परवानगीचा वापर करण्यात आला असून महानगरपालिकेच्या विविध अधिकाऱ्यांनी त्यात सहकार्य केल्याची पुराव्यासह सविस्तर लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते श्री.कुमार काकडे यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभाग 'ब' चे तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी हे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या विकासका विरोधात दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास एमआरटीपीची नोटीस बजावली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर बांधकामाविरोधात सहाय्यक आयुक्त श्री.संतोष मुने यांनी कारवाईचे आदेश देऊनही सदर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सामाजिक कार्यकर्ते श्री.कुमार काकडे यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सविस्तर केलेल्या तक्रारीमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत व या तक्रारीची दखल घेऊन करण्यात आलेल्या बेकायदेशीर बांधकामाविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा पूर्वेकडील तुळींज येथील सर्व्हे क्र.९९, हिस्सा नं. ३ या जागेवर तळमजला अधिक तीन मजले असलेली सिध्दीविनायक अपार्टमेंट इमारत अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर इमारतीस दिनांक २८.०७.२०१७ रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२, ५३ व ५४ अंर्तगत नोटीस बजाविली आहे.

(३) व (४) अ) श्री.काकडे यांच्या उक्त पत्रात खालील बाबी नमुद आहेत: -

• गाव मौजे तुळींज, सर्वे नं. ९९, हिस्सा नं. ३ या जमिनीवर सिडको यांचे बनावट कागदपत्र तयार करुन G+३ मजली सिध्दी विनायक अपार्टमेंट इमारत उभी करण्यात आली असून, नगर रचना विभाग, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यास सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती “बी” यांना कळविले आहे.

• सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती “बी” यांनी सदर अनधिकृत बांधकामासंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील कलमान्वये मे.आर्ची डेव्हलपर्स तर्फे श्री.अरुण ह.जाधव यांस नोटीस दिलेली आहे. परंतु अद्याप कोणतीही कारवाई केली नाही.

• श्री.संतोष मुने, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती “बी” हे सदर बेकायदेशीर कृत्या विरोधात गुन्हा दाखल करण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ करीत आहेत.

ब) या प्रकरणी बांधकाम परवानगी आणि सुधारित बांधकाम परवानगी बनावट असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे. यास्तव, याप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींच्या अनुषंगाने तसेच भा.दं.वि. अंतर्गत गुन्हे दाखल करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका स्तरावर कर्तव्य कसूर झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येत असल्याने संबंधितांविरुध्द शिस्त भंगाची कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे ९५७९/२०१७ रिट याचिका सुनावणीकरीता प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मरोळ (मुंबई) येथील न.भू.क्र. १४९८, १४९८ (ए), १४९८ (बी), १४९८ (सी), व १४९८ (डी) या भूखंडावरील पंचतारांकित हॉटेलच्या बांधकामाबाबत

**(५) * १३०३५४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मरोळ (मुंबई) येथील न.भू.क्र. १४९८, १४९८ (ए), १४९८ (बी), १४९८ (सी), व १४९८ (डी) या भूखंडावरील विकासाबाबत शासनाने शासन राजपत्र क्र. U/no. TPB-४३९२/७१६/CR-१८१/९२/UD-११-दिनांक १२ डिसेंबर, १९९२ अन्वये दिलेल्या निर्देशाचे विकासकाने पालन केले नसून सर्व नियमांचे उल्लंघन करुन उक्त भूखंडावर केलेल्या पंचतारांकित हॉटेल बांधकामाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त भूखंडावरील विकासाबाबत शासन राजपत्र क्र.U/no. TPB-४३९२/७१६/CR-१८१/९२/UD-११-दिनांक १२ डिसेंबर, १९९२ अन्वये कोणते निर्देश दिले होते,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या तक्रारीची दखल घेवून शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.सुनिल राऊत यांचे दिनांक २७/०६/२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या के/पूर्व प्रभागाचे सन १९९१ चे विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३१(१) नुसार शासन अधिसूचना दि.१२/११/१९९२ नुसार शासनाने मंजूरी दिली असून सदर मंजूर विकास योजनेत खालील नमूद जमिनमालकाच्या ताब्यात असलेल्या जमिनीपैकी ५०% जमीन a) नगर भूमापन क्र. १४८३, १४९१,

१४९५, १४९६, १४९७, १५००, १५०३ इत्यादी. b) न.भू.क्र. १४२०, १४३७, १४४५, १४४८, १४३९, १४५७, १४४३, १४८५ इत्यादी. c) सर्वे क्र. ११०(पै), ११७(पै), ११८(पै), १२२(पै), १२३(पै) मौजे सहार पार्ककरीता आरक्षित ठेवावी, त्याचे भूसंपादन करु नये. उर्वरित ५०% शिल्लक जमिनीवरील आरक्षण रद्द करावे व त्याचा वापर जमिन मालकाने फक्त हॉटेलसाठी करावा. मालकाने हॉटेलचा विकास करण्यापूर्वी सदर पार्क विकसित करावे व त्याची देखभाल करावी व मर्यादित वेळेकरीता सर्वसामान्य लोकांसाठी खुले ठेवावे या अटी सापेक्ष सदर जमिन वाणिज्य (सी-१) वापर विभागामध्ये त्याचा समावेश करण्याची अट आहे.

(३) व (४) सदर ठिकाणी मनोरंजन मैदान विकसित असून ते सामान्य जनतेसाठी खुले आहे असे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## भांडुप (प) येथे स्मशानभूमीसाठी भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत

**(६) * १३३५६३ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (प) येथे स्मशानभूमीसाठी भूखंड उपलब्ध करून मिळावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक २७ जानेवारी, २०१५ व त्यानंतर अनेक वेळा आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने भांडुप (प) येथील वॉर्ड क्रमांक १११ येथील एल.बी.एस मार्ग जवळील न.भू. क्रमांक ५९२ अ /१/४ ह्या भूखंडावर नवीन स्मशानभूमी बांधण्याकरिता परवानगी मिळावी असा प्रस्ताव उपायुक्त (परि.६) महानगरपालिका यांनी पत्र क्रमांक एम डी इ /५१९६ ज न दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रमुख अभियंता (विकास नियोजन) महानगरपालिका यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला तरी प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व स्मशानभूमीच्या बांधकामाकरिता अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एस विभागामध्ये ३ स्मशानभूमी आणि १ दफनभूमी अस्तित्वात आहेत. तसेच विकास आराखडा २०३४ मध्ये ५ स्मशानभूमी / दफनभूमींकरीता जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे.

तथापि, विकास नियोजन आराखडा २०३४ मध्ये न.भू.क्र. ५९२अ/१/४ मौजे भांडूप हा भूखंड महानगरपालिका कार्यालय (आर.ओ. १.३) या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार महानगरपालिकेने सदर आरक्षण हे त्याच प्रयोजनाकरीता विकसित करणे अपेक्षित आहे.

-----------------

## श्रीवर्धन तालुक्यातील (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीतील जीवना बंदर येथील ब्रिटीशकालीन पुल धोकादायक झाल्याबाबत

**(७) * १२९०७६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन तालुक्यातील (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीतील जीवना बंदर येथील ब्रिटीशकालीन पुल पूर्णपणे कमकुवत झाला असून या पूलाचा काही भाग कोसळला असून या पूलाच्या ताराही निघाल्या असल्याने हा पूल कोणत्याही क्षणी कोसळण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलावर मोठया प्रमाणात रहदारी असून जीवना कोळीवाडा या ठिकाणी असलेले नागरीक, शाळकरी मुले व शासकीय गोडावूनकडे येणारी-जाणारी वाहने या पुलाचा वापर करीत आहेत तसेच अवजड वाहने ही या पूलावरून ये-जा करीत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीवना बंदर मार्गावर नवीन पूल बांधण्यासाठी दोन वर्षापूर्वी भूमी पूजन झालेले असतानाही श्रीवर्धन नगरपालिकेकडून पुलाच्या बांधकामाचे कोणतेही काम आजमितीस केले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जीवना बंदर परिसरातील पुलाच्या पुनर्बांधणीचे काम रखडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदरहू जीवना बंदर परिसरातील पुलाची धोकादायक असलेली परिस्थिती व या पूलावरून जड वाहनांसह मोठ्या प्रमाणात होत असलेल्या वाहतूकीमुळे पूल कोसळण्याची दुर्घटना होण्यापूर्वी सदरहू पूलाचे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) श्रीवर्धन शहरातील जीवना बंदर येथील लहान खाडीवरील सदरच्या ब्रिटीशकालीन पुलावरुन सद्यस्थितीत नियमीत रहदारी सुरु असल्याचे श्रीवर्धन नगरपरिषदेने कळविले आहे.

• तथापि, सदर पुलाचे रेलिंग व पुलाचा काही भाग जीर्ण झाल्याची बाब सन २०१२ मध्ये केलेल्या प्रत्यक्ष पहाणीत नगरपरिषेदच्या निदर्शनास आल्यानंतर पुलाचे नवीन रेलिंग बनविण्यात आले असून किरकोळ दुरूस्ती करण्यात आली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) सदर पुल ब्रिटीशकालीन असल्याने व त्यावरील रहदारी विचारात घेऊन सन २०१३-१४ मध्ये सदर पुलाचे नव्याने बांधकाम करण्याकरीता नगरपरिषदेने निविदा प्रक्रीया पूर्ण करुन कंत्राटदारास कामाचे आदेश दिले होते.

• तथापि, जीवना बंदराकडे जाण्यासाठी पर्यायी मार्गास लगतच्या खाजगी जागेच्या मालकाने विरोध केल्यामुळे व दुसरा पर्यायी मार्ग उपलब्ध न झाल्याने कंत्राटदाराच्या विनंतीवरुन सदरहू कंत्राट रद्द करण्यात आले.

• सद्यस्थितीत पर्यायी मार्गासह रु. २५.३४ लक्ष इतक्या रक्कमेचे सुधारित अंदाजपत्रकानुसार सदरहू पुलाच्या बांधकामाची विहीत निविदा प्रक्रीया पूर्ण करुन नवीन कंत्राट देण्यात आले आहे.

• माहे फेब्रुवारी, २०१९ अखेर सदर पुलाचे बांधकाम पुर्ण करण्याचे नियोजन असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिलमधील ट्रेड हाऊस इमारतीच्या गच्चीवरील वन अबव्ह आणि मोजो बिस्त्रो या पबला लागलेल्या आगीच्या चौकशीबाबत

**(८) * १२६५३८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या कमला मिल आग दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यु झाल्याप्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेल्या न्यायिक चौकशी समितीने कमला मिलचे सह मालक श्री.रमेश गोवानी व दोन्ही हॉटेल्सच्या सहा मालकांवर ठपका ठेऊन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश शासनास दिनांक १३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभाग व उद्योग विभागातील सबंधित अधिकारी आणि मुंबई महानगरपालिकेच्या सबंधित अधिका-यांनी कर्तव्य बजावताना अक्षम्य हलगर्जीपणा केल्याचा ठपकाही समितीने ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीस महानगरपालिकेला माहे एप्रिलपासून चार महिन्यांच्या मानधनापोटी १८ लाख ३० हजार रुपये दयावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू न्यायिक समितीच्या अहवालानुसार शासनाने संबधित दोषींविरूध्द आरोप निश्‍चित करून कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जनहित याचिका क्रमांक ४ /२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशान्वये, कमला मिल आग दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता त्रिसदस्यीय समिती नेमली होती. सदर

समितीने चौकशी अहवाल दिनांक ०७.०९.२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयास सादर केला आहे.

(३) सदर त्रिसदस्यीस समितीला महानगरपालिकेमार्फत मानधन देण्याबाबतचे मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले होते.

सदर चौकशी समितीचे अध्यक्ष यांनी मानधन नाकारले असून उर्वरित दोन सदस्यांचे आणि समितीच्या अध्यक्षांनी नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांचे रु.१८.४० लाख इतके मानधन महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आले आहे.

(४) सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने देण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडर जोडण्यांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(९) * १३३७२६ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने देण्यात येणा-या गॅस सिलेंडर जोडण्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी भंडारा पोलिसांनी आदिवासी विकास महामंडळाच्या सात अधिकारी, कर्मचा-यांविरुद्ध गुन्हे दाखल केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उपप्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, उपप्रादेशिक कार्यालय, देवरी महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आदिवासी विकास महामंडळाच्या ७ अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुध्द दिनांक २५/७/२०१८ रोजी पोलीस ठाणे भंडारा येथे गुन्हा र. नं.५७१/१८ कलम ४२०, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील वागळे इस्टेट येथील मॉडेला चेकनाका परिसरात स्मशानभूमी उभारण्याबाबत

**(१०) * १३३१९६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील वागळे इस्टेट येथील मॉडेला चेकनाका परिसरात स्मशानभूमी उभारण्यात यावी अशी त्या परिसरातील नागरिकांची अनेक वर्षापासूनची मागणी असल्याने ठाणे महानगरपालिकेने दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास झालेल्या महासभेत एकमताने मॉडेला मिल परिसरात स्मशानभूमी निर्माण करण्याचा प्रस्ताव पारित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव पारित करुन एक वर्षाचा कालावधी झाला असून स्मशानभूमी उभारण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने मा. मुख्यमंत्री, नगरविकास राज्यमंत्री, आयुक्त, ठाणे महानगरपालिका आदींकडे तेथील नागरिकांनी निवेदनाद्वारे सदरहू स्मशानभूमीचे काम त्वरित हाती घेऊन पूर्ण करण्याची मागणी केलेली असतानाही या प्रकरणी कोणतीही कार्यवाही न झाल्याने माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान नागरिकांनी उपोषणास बसून आंदोलनही केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जागेवर विनाविलंब स्मशानभूमीच्या उभारणीचे काम हाती घेऊन स्मशानभूमी लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

सेक्टर ३ येथील मॉडेला वुलन मिल या कंपनीच्या जमिनीवर स्मशानभूमीचे नवीन आरक्षण टाकण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्याच्या नगरसेवकाच्या प्रस्तावाच्या सूचनेस ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक २०.०२.२०१३ रोजी प्रशासनाच्या निर्णयास अधिन राहून सर्वानुमते मान्यता दिली आहे.

सदर मान्यता केवळ प्रस्ताव सूचनेस होती. सदर ठिकाणी स्मशानभूमीचे आरक्षण दर्शविणे शक्य होणार नसल्याचे तसेच सेक्टर ३ मध्ये इतर योग्य जागा निश्चित करून याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यात येईल, असे संबंधित नगरसेवकास ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये येथील नागरीकांनी उपोषणास बसून आंदोलन केलेले नाही.

तथापि, दिनांक १२.०२.२०१४ रोजी श्री.विजय त्रिपाठी यांनी मौजे पाचपाखाडी स.नं.४६४ (पै), ४६५ (पै), व ६६ (पै), (मॉडेला मिल) या भूखंडामध्ये स्मशानभूमीचे आरक्षण करण्याबाबत लेखी निवेदन दिलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) जयभवानी नगर, वागळे इस्टेट, सेक्टर ३ मधील अस्तित्वातील हिंदु स्मशानभूमीचे नुतनीकरण करण्यात येत आहे. तसेच हनुमाननगर, सेक्टर ३ येथे ख्रिश्चन दफनभूमी अस्तित्वात आहे व सदर दफनभूमीची जागा महाराष्ट्र विकास औद्योगिक महामंडळाकडून ठाणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

मॉडेला वुलन मिलची एकूण क्षेत्र ५७,९६२ चौ.मी. असून यापैकी २३,२५६ चौ.मी. इतके क्षेत्र रस्ते व पार्कींग आरक्षणांनी बाधित आहे. उर्वरित ३४,७०६

चौ.मी. इतके क्षेत्र रहिवासी विभागात येत असून संबंधित विकासकामार्फत रेंटल हाऊसिंग स्कीम अंतर्गत दाखल विकास प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेने दिनांक २३.०२.२०१६ रोजी मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश महानगरपालिका अग्निसुरक्षा निधी खर्च करण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबत

**(११) * १३२७४२ कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध शहरात लागलेल्या आगीच्या घटनांमध्ये शेकडो लोकांचा मृत्यु होऊनही त्या शहरातील महापालिका आग प्रतिबंधक उपाययोजनांसाठीचा निधी खर्च करण्याकडे दुर्लक्ष करित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक औरंगाबाद, नागपूर, अमरावती या आठ महानगरपालिकांनी सन २०११ ते २०१५ या पाच वर्षात तरतूद केलेल्या ५४८ कोटी २४ लाख रुपयांचा निधी खर्च केला नसल्याची गंभीर बाब भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांच्या अहवालात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांश महानगरपालिकेने अग्निसुरक्षा निधी स्थापन करण्याच्या आदेशाकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून राज्यातील महानगरपालिकांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणेसाठी अधिकाधिक निधीची तरतूद करून अद्ययावत अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यन्वित करण्यासाठी शासनाने कोणत्या उपायोजना केल्या वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) • भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी राज्यातील आठ निवडक महानगरपालिकांमध्ये “आगीचा प्रतिबंध आणि नियंत्रण” याबाबत सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीचे लेखापरिक्षण केलेले होते.

• सदर लेखापरिक्षणामध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या आठ महापालिकांमध्ये २०१०-११ ते २०१४-१५ या वर्षात अग्निशमन सेवेसाठी अर्थसंकल्पीत केलेल्या निधीपैकी रु.५४८.२४ कोटी निधी अखर्चीत असल्याचे निदर्शनास आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) • लेखापरिक्षण करण्यात आलेल्या आठ महानगरपालिका पैकी सात महानगरपालिकांनी अग्निसुरक्षा निधी स्थापन केला आहे. एका महानगरपालिकेत त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(४) • दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीतील अग्निशमन सेवेसाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधी पैकी अखर्चीत निधी त्वरीत खर्च करण्याबाबत व अग्निसुरक्षा निधी स्थापन करण्याबाबतचे निर्देश राज्यातील महानगरपालिकांना दिलेले आहेत.

• दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत राज्यातील सर्व नगरपंचायती, सर्व नगरपरिषदा व “ड” वर्ग महानगरपालिका यांना अग्निशमन सेवेतील तुट भरुन काढण्याकरीता व अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एमकॅप हे बाजारात मूल्य नसलेले आभासी चलन देऊन लोकांची केलेली फसवणूक

**(१२) * १३४१०७ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रिप्टोकरन्सी असलेले बीटकॉईन घेऊन त्या बदल्यात एमकॅप हे बाजारात मूल्य नसलेले आभासी चलन देऊन फसवणूक केल्याप्रकरणी निगडी (ता.जि.पुणे) पोलीस ठाण्यात माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात १२० लोकांनी तक्रार दाखल केली असून त्यामध्ये एकूण १२ कोटी रुपयांची फसवणूक झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणात एकूण १२४ गुंतवणूकदारांची ११,०३,६४,६९२/- रूपयांची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरून ९ आरोपींविरूद्ध निगडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. १८१/२०१८ भादंवि कलम ४०६, ४०९, ४२०,१२०(ब) ,२०१, १०९ सह माहीती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६ डी एमपीआडी कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात आरोपींविरूद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अतिधोकादायक व धोकादायक शौचालयांची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(१३) * १२९२२१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा),**

**श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत काही वर्षामध्ये शौचालयांच्या टाक्या खचून अपघात झाले असून या अपघातांची गंभीर दखल घेत आयुक्त, महानगरपालिका यांनी माहे जानेवारीमध्ये मुंबईतील सार्वजनिक शौचालयांची संरचनात्मक तपासणी करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांना दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुंबईमध्ये १,४१५ सार्वजनिक शौचालये असून ९३४ सार्वजनिक शौचालयांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३८३ शौचालये (सी-१) अतिधोकादायक अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिधोकादायक व धोकादायक शौचालयांची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उर्वरित ४८९ शौचालयांची तपासणी करण्यास प्रशासनाकडून विलंब होण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण १९६४ शौचालयांपैकी १६५३ शौचालयांची संरचनात्मक तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये ५३२ शौचालये अतिधोकादायक अवस्थेत (सी-१) असल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर ५३२ शौचालयांपैकी दुरुस्ती करुन सुव्यवस्थित करणे शक्य असलेल्या शौचालयांच्या दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली असून दुरुस्ती शक्य नसलेली शौचालये तोडून नवीन बांधण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(४) उर्वरित ३११ शौचालये सुस्थितीत असल्याने त्यांची महानगरपालिकेमार्फत संरचनात्मक तपासणी करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोकरदन (जि.जालना) शहरातील पाणीटंचाईबाबत

**(१४) * १३०५५३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन (जि.जालना) शहराला पाणीपुरवठा करणा-या दानापूर येथील जुई धरणातील पाणीपुरवठ्याच्या विहिरीला मुबलक पाणी असतानाही नगरपालिका प्रशासनाच्या ढिसाळ व नियोजनशून्य कारभारामुळे शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोकरदन शहराला तातडीने पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दानापूर येथील जुई धरणातील पाणीपुरवठ्याच्या विहिरीला मुबलक पाणी नसून, भोकरदन (जि.जालना) शहरास २.४५ दशलक्ष लिटर इतक्या पाण्याची आवश्यकता असताना उपलब्धतेनुसार सध्या ०.९ दशलक्ष लिटर इतक्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो, ही वस्तुस्थिती असल्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी अहवाल सादर केला आहे.
(२) भोकरदन शहराला तातडीने पाणीपुरवठा करण्यासाठी २० हजार लिटर क्षमतेचे १५ टँकर प्रत्येकी ३ फेऱ्यांप्रमाणे जिल्हाधिकारी, जालना यांनी मंजूर केले आहेत.
• तसेच तातडीची पाणी पुरवठा योजनेचे (बानेगांव ते भोकरदन पाईपलाईन टाकण्यासाठीचे) अंदाजपत्रक तयार करण्याकरीता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, जालना यांच्यामार्फत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी अहवाल सादर केला आहे.

• त्याशिवाय दीर्घकालीन उपाययोजना म्हणून सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातून खडकपूर्णा धरणावरुन सिल्लोड-भोकरदन पाणी पुरवठा योजनेतुन १ दशलक्ष लीटर पाणी भोकरदन शहरास मिळणार आहे. सदर योजना प्रगतीपथावर असून पुढील तीन महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांना म्हाडाच्या सोडतीत मिळालेल्या घरांचा ताबा देण्याबाबत

**(१५) * १२६५३० श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या सोडतीत मुंबईतील ज्या गिरणी कामगारांना घरे मिळाली व नियमानुसार त्या घराची रक्कम भरली असूनही त्यांना अद्यापही घराचा ताबा देण्यात आला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घराकरिता काढलेल्या कर्जाचे हप्तेही सुरु झाले असून त्यांच्या अर्जाची अजून छाननी सुरु असल्याचे म्हाडामार्फत सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, लाभार्थी गिरणी कामगारांना त्यांच्या घराचा ताबा किती कालावधीत देण्यात येणार आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२), (३) व (४) सोडतीत यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांना प्राधिकृत / अपिलीय अधिकारी यांच्या चमूने पात्र केल्यानंतर सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा करणेसाठी तात्पुरते देकारपत्र निर्गमित करण्यात येते. सदर तात्पुरते देकारपत्रानुसार म्हाडाने नियुक्त केलेल्या बँकेत भरणा केलेली रक्कम म्हाडाच्या खात्यात जमा झाल्याची खातरजमा

झाल्यानंतर, त्यांना मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यासाठी कळविण्यात येते. सदर बाबीची पूर्तता केल्यानंतर त्यांना नियमानुसार सदनिकेचे वितरण करण्यात येते.

ज्या गिरणी कामगार / वारसांनी सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा करुन वरील बाबींची पूर्तता केली आहे, अशा गिरणी कामगार / वारसांच्या वितरणासाठी माहे नोव्हेंबर, २०१८ मधील दर सोमवारी विशेष मोहिम म्हाडातर्फे राबवित आहे.

-----------------

## नांदेड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांची नियमबाहय झालेली नियुक्ती

**(१६) * १२७२०९ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिका आस्थापनेवर सन २००९-१० मध्ये लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार लिपीक संवर्गातील एकूण ०९ कर्मचाऱ्यांच्या करण्यात आलेल्या अवैध/नियमाबाहय नियुक्ती संदर्भात चौकशी करण्यासाठी तत्कालिन आयुक्त श्री गणेश देशमुख यांनी तत्कालिन मुख्य लेखापरिक्षक श्री रावसाहेब कोलगणे यांची एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी पूर्ण होऊन समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ११ जून, २०१८ व २३ ऑगस्ट, २०१८ रोजी सदर गैरव्यवहाराची चौकशी करुन सुनावणी घेणेबाबत पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समितीच्या अहवालानुसार दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) • स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवेदनानुसार मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे दिनांक १६.१०.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आलेली आहे.

• मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांनी प्रस्तुत बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सदर नियुक्त्या नियमानुसार आहेत किंवा कसे याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्रकरण अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेले आहे.

• सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावदा नगरपरिषदेस सन २०१५-१६ करिता मिळालेल्या वैशिष्ट्यपूर्ण व विशेष रस्ता अनुदानाच्या अखर्चित निधी खर्चास मुदतवाढ मिळणेबाबत

**(१७) * १३४०८९ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा नगरपरिषदेस सन २०१५-१६ करिता वैशिष्ट्यपूर्ण व विशेष रस्ता अनुदान म्हणून रु.५.०० कोटी अनुदान प्राप्त झाले असून सदरची कामे प्रस्तावित असल्याने अखर्चित निधी खर्चास मुदतवाढ मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये सावदा नगरपरिषदेस “वैशिष्ट्यपूर्ण” योजनेंतर्गत नगरपरिषद हिश्यासह रु.४.२० कोटी व “विशेष रस्ता अनुदान” अंतर्गत रु.३.०० कोटी वितरीत करण्यात आले आहेत.

• सदर वितरीत निधीपैकी अखर्चित निधी खर्च करण्यास मुदतवाढ देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींचे दि.६ ऑगस्ट, २०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

• सदर अखर्चित निधी दि.३१ मार्च, २०१९ पर्यंत खर्च करण्यास दि.१० सप्टेंबर, २०१८ च्या शासन पत्रान्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.

-----------------

## घोडबंदर व वर्तक नगर (जि.ठाणे) येथे उभारण्यात आलेल्या थीम पार्कच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * १३०३६३ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर व वर्तकनगर (जि.ठाणे) येथे उभारण्यात आलेल्या थीम पार्क आणि बॉलीवुड पार्क या दोन थीम पार्कच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्याबाबत सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, त्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निवेदन / पत्र आढळुन आले नाही.

(२) याप्रकरणी ठाणे महानगरपालिकेमार्फत २ स्तरावर चौकशी सुरू आहे.

• महापौर, ठाणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

• जे.जे. स्कुल ऑफ आर्टस व मे.वॅपकॉस लि. यांचे मार्फत त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

उक्त चौकशी समितीचा तसेच त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी पुढील निर्णय घेणार असल्याचे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील उड्डाणपुलाखाली सरकत्या जिन्यासह पादचारी पुलाच्या बांधकामास विलंब होत असल्याबाबत

**(१९) * १३३२०१ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गावर साखळी क्र. ५१९/००, अंधेरी (पूर्व) येथे उड्डाणपुलाखाली सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत प्रशासकीय मान्यताप्राप्त होऊन व सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रुपये ३.५ कोटी एवढा निधी मंजूर होऊनही सरकत्या जिन्यासह पादचारी पुलाच्या आराखड्यास अंतिम स्वरूप देण्याचे काम एमएमआरडीएच्या मेट्रो लाईन-७ च्या कामाची सविस्तर आखणी व संकल्पन निश्चित न झाल्यामुळे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांसह स्थळ पाहणी करून व मेट्रो-७ च्या कामाचा आढावा घेऊन सदर पादचारी पुलाचे काम सुरु केले जाऊ शकत असल्याचा अभिप्राय दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अभिप्रायास अनुलक्षून व पश्चिम द्रुतगती मार्गावर रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना व वाहनांना होणाऱ्या त्रासाची गंभीर दखल घेऊन सदर पादचारी पुलाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाचे पत्र क्र. ११६/२०१८, दिनांक २१.०५.२०१८ च्या पत्रान्वये सदर पादचारी पूलाचे काम सा.बां.विभागामार्फत करण्याचे सुचविले आहे.

(३) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो-१ व प्रस्तावित मेट्रो-७ स्थानकांना जोडणारा पूल बांधण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, महामार्ग ओलांडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधावयाचा पूलाबाबत मेट्रोबाबत चर्चा करुन आराखडा अंतिम करण्यात येऊन अंदाजपत्रक तयार करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बांगला देशातून तरुण व अल्पवयीन मुलींना नोकरीचे आमिष दाखवून त्यांना वेश्या व्यवसायात आणणा-या टोळीच्या प्रमुखाला वसई पोलीसांनी केलेली अटक

**(२०) * १३०७२३ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांगला देशातून तरुण व अल्पवयीन मुलींना नोकरीचे आमिष दाखवून त्यांना वेश्या व्यवसायात आणणा-या टोळीच्या प्रमुखाला दिनांक ६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास वसई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोपीने वर्षभरात सुमारे ५०० मुलींची भारतात तस्करी केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषींवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणातील आरोपीत याने बांगलादेश मधील मुलींची तस्करी केल्याबाबत ३ गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून त्यानुसार पालघर जिल्ह्यात

१) विरार पोलीस ठाणे गुरनं. २३/२०१७ पिटा कलम ३, ४, ५ सह पोस्को ४, १७ प्रमाणे.

२) तुळींज पोलीस ठाणे गुरनं. ३९४/२०१७ भादविसक ३६३, ३६६ (अ), ३४२, ३७०, ३७० (अ), ३५४, ३४ सह पोस्को कलम ८, १२ पिटा कलम ८ प्रमाणे पालघर पोलीस ठाणे गुरनं. १५६/२०१८ भादविसक ३७० (अ), ३७६, ३२८, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह पिटा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मार्वेल इंडस्ट्रीज लि. कंपनी, माळेगाव औद्योगिक वसाहत (ता.सिन्नर, जि.नाशिक) यांनी कर्मचाऱ्यांचे वेतन थकविल्याबाबत

**(२१) * १३३८१५ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळेगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) औद्योगिक वसाहत येथील मार्वेल इंडस्ट्रीज लि. प्रकल्पातील कायमस्वरूपी कार्यरत असलेल्या ४०० कर्मचा-यांचे थकीत वेतन मिळण्यासाठी कामगारांनी कामगार आयुक्त, नाशिक यांना वेळोवेळी लेखी निवेदने देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना उदरनिर्वाह करणे अशक्यप्राय झाल्याने थकीत वेतन अदा करण्यासाठी तत्काळ आदेश देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. कामगार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.

मार्वेल इंडस्ट्रीज लि. प्रकल्पातील कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या श्रमिक सेना युनियन, नाशिक जिल्हा या संघटनेने माहे डिसेंबर, २०११ व जानेवारी, २०१२ या दोन महिन्याचा पगार थकित असल्याचे निवेदन दिनांक १५.२.२०१२ रोजी दिले होते.

(२) हे अंशतः खरे आहे.

एका लोकप्रतिनिधींनी दिनांक १३.१.२०१५ व दिनांक ८.२.२०१६ रोजी निवेदन दिले आहे.

(३) श्रमिक सेना युनियन, नाशिक जिल्हा या संघटनेच्या दिनांक १५.२.२०१२ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने कामगार उप आयुक्त नाशिक कार्यालयात दिनांक २१.२.२०१२, दिनांक ०१.०३.२०१२, दि.०५.०३.२०१२, दि.१२.३.२०१२, दि.२१.३.२०१२, दि.३०.४.२०१२ रोजी संयुक्त बैठका आयोजित करण्यात आल्या. त्यानुसार माहे डिसेंबर, २०११ या महिन्याचे वेतन दिनांक २१.२.२०१२ रोजी अदा करण्यात आले तर माहे जानेवारी, २०१२ चे वेतन माहे मार्च, २०१२ अखेर अदा करण्यात येईल असे व्यवस्थापनातर्फे दिनांक २१.२.२०१२ व दिनांक ०१.३.२०१२ रोजीच्या बैठकीत सांगण्यात आले . तथापि, हा कारखाना दिनांक ३१.०१.२०१२ पासून बंद असून सदरची कंपनी अवसायानात निघाली आहे. कारखान्याची मालमत्ता सिकॉम लि. मुंबई यांच्या ताब्यात आहे. सदर कंपनी अवसायानात निघालेली असल्याने कामगारांची देणी मिळण्यासाठी अवसायानाकडे दावे दाखल करावेत असे संबंधितांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण, उल्हासनगर आणि ठाणे येथील न्यायालयात १२५ पेक्षा अधिक आरोपींना बनावट कागदपत्राच्या आधारे जामीन देऊन सोडविण्यात आल्याबाबत

**(२२) * १२८२३५ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण, उल्हासनगर आणि ठाणे येथील न्यायालयात १२५ पेक्षा अधिक आरोपींना बनावट कागदपत्राच्या आधारे जामीन देऊन सोडविले असल्याची गंभीर बाब दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ठाणे पोलीसांच्या गुन्हे अन्वेषण शाखा युनिट क्र. ४ च्या पोलिसांनी कारवाई केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी तपास पूर्ण झाला आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, कल्याण येथे गु.र.क्र. ३१५/२०१८, भा.द.वि. कलम ४१९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४७२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाच्या तपासात मुख्य आरोपीच्या ताब्यातून वेगवेगळी शासकीय कार्यालय व विविध ग्रामपंचायतींचे असे एकूण ४५ रबरी शिक्के, बनावट शिधापत्रिका आणि ग्रामपंचायत टॅक्स पावती सह जप्त केले आहे. सदर गुन्हयात ८ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झुला मैदान, मदनपुरा (मुंबई) येथील मैदानाच्या जागेत भूमिगत वाहनतळासाठी निविदा प्रक्रिया सुरू केल्याबाबत

**(२३) * १३०८६०  ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील झुला मैदान, मदनपुरा, मुंबई-८ या ब्रिटिशकालीन खेळाचे व सांस्कृतिक कार्यक्रम होत असलेल्या मैदानाच्या जागेत भूमिगत वाहनतळ बनविण्याच्या विरोधात स्थानिक जनतेचा विरोध डावलून मुंबई महानगरपालिकेतर्फे भूमिगत वाहनतळासाठी आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता प्रशासकीय मंजुरी व निधी मंजूर केला तसेच निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत कार्यवाहीचे आश्वासन नगरविकास राज्यमंत्री यांच्यातर्फे देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भायखळा विधानसभा मतदार संघाअंर्तगत रहेजा डेव्हलपर्स तसेच अन्य विकासकांनी मोठ-मोठे टॉवर्स बांधले आहेत व १४०० वाहनतळाची जागा अद्याप महानगरपालिकेला सुपूर्द केली नसल्याची तसेच वाहनतळाची जागा बळकावून करून करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी तसेच वाहनतळाचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनामार्फत चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच दोषींवर केलेल्या प्रशासकीय व दंडात्मक कारवाईचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) भायखळा येथील झुला मैदान येथे भूमीगत वाहनतळाच्या बांधकामाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हिंदुस्तान मिल रहेजा, जेकब सर्कल येथील विकास प्रकल्पामध्ये सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अन्वये मंजूर नकाशानुसार सार्वजनिक वाहनतळाचे (पीपीएल) बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर सार्वजनिक वाहनतळ महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

झूला मैदान परिसरात याव्यतिरिक्त अन्य ०३ विकासकांना महानगरपालिकेमार्फत आशयपत्र देण्यात आले असून त्यातून वाहन पार्किंगकरीता २४९२ + १०८ (दुचाकी) वाहनांच्या पार्किंगकरीता जागा मिळणे अपेक्षित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वच्छ भारत अभियानांतर्गत हगणदारीमुक्त मुंबईसाठी वर्षभरात २२ हजार ७०० शौचकुप बांधण्याबाबत

**(२४) * १२७९०६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ भारत अभियानांतर्गत हगणदारीमुक्त मुंबईसाठी वर्षभरात २२ हजार ७०० शौचकुप बांधण्याचा कार्यक्रम मुंबई महानगरपालिकेने हाती घेतला असून त्यासाठी कंत्राटदारांनी भरलेल्या निविदा सुमारे दुप्पट जादा दराने आल्याने ती प्रक्रियाच रद्द करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्ट्यांमधील नव्याने बांधलेल्या शौचालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याने त्यांची दुरुस्ती करावी लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे,

• मुंबई महानगरपालिकेमार्फत २२,७७४ शौचकुपांचे बांधकाम करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने कंत्राट लॉट-११ अंतर्गत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

• सदर निविदा उघडल्यानंतर निविदाकारांनी सदर निविदा अति उच्च दराने भरल्याचे निदर्शनास आल्यावर नियामानुसार त्या निविदाकरांसोबत दर कमी करण्याबाबत वाटाघाटी करूनही दर कमी न झाल्याने हा कंत्राट लॉट-११ रद्द करण्यात आला.

• याच कामासाठी पुनर्निविदा कंत्राट लॉट-११ (आर) अंतर्गत सप्टेंबर, २०१८ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामधील ३८ पैकी २५ निविदांना प्रतिसाद मिळाला असून उर्वरित १३ निविदांना प्रतिसाद नसल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

• कंत्राट लॉट-१० अंतर्गत २७२० शौचकुपे बांधण्यात आली आहेत. त्यापैकी ४६ शौचकुपे असलेल्या २ शौचालयांच्या युनिट मधील कामांबाबत मुंबई महानगर पालिकेकडे तक्रार प्राप्त झाली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले. त्यामुळे या शौचालयांची आवश्यक दुरूस्ती संबंधित कंत्राटदारामार्फत दायित्व कालावधीतंर्गत मुंबई महानगर पालिकेमार्फत करून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव तालुक्यातील कोदगाव रस्त्यावरील बनावट दारु बनविणाऱ्या कारखान्यांवर छापा टाकल्याबाबत

**(२५) * १३२४९९ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव तालुक्यातील कोदगाव रस्त्यावर सुरु असलेल्या बनावट दारु बनविणाऱ्या कारखान्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू छाप्यामध्ये बनावट दारु बनविण्याचे साहित्य व मुद्देमाल हाती सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार बनावट दारु बनविण्याचा कारखाना चालविणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) बनावट देशी दारू तयार करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला प्रोव्हीबिशन गु.र.नं.६०४५/२०१८ मु.प्रो. ॲ.क.६५(ई) सह भा.दं.वि.कलम ३२८, ४२०, ४६५, ३४, प्रमाणे दि.०५/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात एकुण ४ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ३,४१,८५६/- रूपये किंमतीची बनावट दारू व बनावट दारू तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडीधारकांना डी.सी. रूल ३३ (९) अंतर्गत ३५ चौ.फुट फंजिबल अतिरिक्त क्षेत्रफळ उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) * १२७११५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडीधारकांना डी.सी. रूल ३३ (९) अंतर्गत मिळणाऱ्या २६९ चौ.फुट क्षेत्राबरोबर ३५ चौ. फुट अतिरिक्त फंजिबल क्षेत्रफळ देण्याबाबत शासनाने डि.सी. रूल नियमावलीमध्ये तरतूद करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डि.सी. रूल ३३ (५) व (७) नुसार विक्री सदनिकेच्या ३५ टक्के फंजिबल क्षेत्रफळ देण्याची तरतूद असल्याने त्याच धर्तीवर झोपडीधारकांना अतिरिक्त फंजिबल क्षेत्रफळ देण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) सन्माननीय विधानसभा सदस्यांचे दिनांक ०४/०९/२०१८ रोजीचे निवेदन दिनांक ८/०९/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात विनियम ३३(१०) मध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन सदनिकेसाठी ३५% फंजिबल क्षेत्रफळ देण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे.

(२) व (३) शासन नगर विकास विभागाकडील दि.८ मे, २०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला सारभूत स्वरुपाचे फेरबदल वगळून शासनाने मंजूरी दिली असून सदर मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे. तसेच शासनाकडील दि.२३/०९/२०१८ रोजीचे अधिसूचनेन्वये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील सारभूत स्वरुपाचे फेरबदलास मंजूरी देण्यात आली असून ते दि.१३/११/२०१८ पासून अंमलात आले आहेत. दिनांक १२/११/२०१८ रोजी मुळ अधिसूचनेस शुध्दीपत्रक निर्गमित केलेले आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन सदनिकेच्या २६९ चौ. फूट (२५.०० चौ.मी.) क्षेत्रामध्ये वाढ करुन ३०० चौ. फूट (२७.८८ चौ.मी.) सदनिकेचे क्षेत्र अनुज्ञेय करणेत आलेले आहे. झोपडपट्टी धारकांना जादा चटई क्षेत्र उपलब्ध होणेच्या अनुषंगाने कार्यवाही झालेली आहे.

-----------------

## भंडारा जिल्हयातील वाळूचे होत असलेले अवैध उत्खनन

**(२७) * १३३३६३ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोह (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील वाळु उत्खनन व जिल्हयातील इतर अवैध वाळु उत्खननाचे प्रकरणे आणि वाहतुकीस प्रोत्साहन देणाऱ्या भंडारा पोलिसांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करताना रोह व जिल्ह्यातील इतर प्रकरणात अवैध वाळू पकडल्याप्रकरणी पोलिसांचे वाळू माफियांशी असलेल्या संबंधांची खात्री करण्यासाठी त्यांचे भ्रमणध्वनीचे सी.डी.आर. तपासण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोह येथील प्रकरणात घटनास्थळावर पोलीस कोणत्या महसूल अधिकाऱ्याच्या निर्देशाने गेले होते तसेच उक्त प्रकरणी तेथे जाण्यासाठी कोणाची परवानगी घेण्यात आलेली होती, परवानगी नसतानाही गुन्हे शाखेने कोणत्या घटनास्थळी भेट दिली व भेटीचा उद्देश काय होता याची चौकशी करून कारवाईची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करून सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी आवश्यक चौकशी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत दि. २७.९.२०१८ च्या शासन पत्रान्वये पोलीस महासंचालक यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळी (जि.बीड) येथील वैद्‌यनाथ सहकारी साखर कारखान्यातील रसाच्या टाकीच्या झालेल्या स्फोट दुर्घटनेच्या चौकशीबाबत

**(२८) * १२९८८६ श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) येथील वैद्‌यनाथ सहकारी साखर कारखान्यात दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास रसाच्या टाकीच्या झालेल्या स्फोट दुर्घटनेची चौकशी सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुडस् मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेस ॲक्ट अंतर्गत याच कारखान्याचा निलंबित करण्यात आलेला परवाना पुन्हा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परवाना रद्द करण्याची कारवाई करणाऱ्या सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना कोणत्या कारणास्तव निलंबित करण्यात आले आहे,

(४) असल्यास, दुर्घटनेसंबंधी सुरु करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना लि.,पांगरी, परळी वैजनाथ, जि.बीड या कारखान्यात दिनांक ०८.१२.२०१७ रोजी अंदाजे ३.०० वा. इव्हेंपोरेटर बॉडी क्र.१ चे वाफ गळती दुरुस्तीचे काम झाल्यानंतर सदरील बॉडीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग अचानक निघून बॉटम प्लेट जमिनीवर पडले. या दुर्घटनेसंबंधी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, औरंगाबाद मार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(२) मा.विरोधी पक्ष नेता श्री.धनंजय मुंडे यांचेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने परळी (जि.बीड) येथील मे.वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात दिनांक ०८.०५.२०१७ रोजी वा त्या सुमारास रसाच्या टाकीच्या झालेल्या स्फोट दुर्घटनेसंबंधी अन्न व औषध प्रशासन गुप्त वार्ता शाखेचे अन्न सुरक्षा अधिकारी व अन्न व औषध प्रशासन, बीड येथील सुरक्षा अधिकारी यांचे पथकाने दिनांक १६.१२.२०१७ रोजी वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, परळी, जि.बीड पेढीची सखोल तपासणी करुन दोन साखरेचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले. साखरेच्या नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रमाणित आले असून तपासणी मधील त्रृटींच्या अनुषंगाने पेढीला दिनांक २३.०१.२०१८ रोजी सुधारणा नोटीस सहायक आयुक्त (अन्न) तथा पदावधीत अधिकारी, अन्न व औषध प्रशासन,बीड यांनी पाठविली. पेढीने सुधारणा नोटीसीला दिनांक १६.०२.२०१८ रोजी उत्तर दिले. त्यानुषंगाने गुप्त वार्ता शाखेचे अन्न सुरक्षा अधिकारी व अन्न व औषध प्रशासन,बीड येथील अन्न सुरक्षा अधिकारी यांचे पथकाने दिनांक १५.०३.२०१८ रोजी पुन्हा पेढीची फेर

तपासणी केली. त्यानुषंगाने सहायक आयुक्त (अन्न) तथा पदावधीत अधिकारी, अन्न व औषध प्रशासन,बीड यांनी पेढीला दिनांक १९.०३.२०१८ रोजी परवाना निलंबन आदेश काढले.

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, परळी (जि.बीड) यांनी दिनांक २६.०३.२०१८ च्या पत्रान्वये मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेकडे सहायक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन,बीड हे महाराष्ट्र राज्याच्या बीड जिल्ह्याकरिता सहायक आयुक्त (अन्न) म्हणून कार्यरत आहेत व त्यांना केंद्रीय परवाना निलंबन करण्याचे अधिकार नाहीत. त्यामुळे त्यांनी दिलेले दिनांक १९.०३.२०१८ रोजीचे अधिकार चुकीचे व बेकायदेशीर असल्याबाबत तक्रार दाखल केली.

सहायक आयुक्त (अन्न), बीड यांनी दिलेले परवाना निलंबनाबाबतचे दिनांक १९.०३.२०१८ रोजीचे आदेश हे प्रभावशून्य असल्याने सदर प्रकरणात पुढील बाबी पाहण्यासाठी केंद्रीय परवाना अधिकारी तथा पदावधीत अधिकारी, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, पश्चिम विभाग, मुंबई यांचेकडे सदर प्रकरण दिनांक २७.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये वर्ग करण्यात आलेले आहे.

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, परळी (जि.बीड) या आस्थापनेकडे अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण अंतर्गत केंद्रीय परवाना क्र.१००१३०२२००१९१३ मुदत दिनांक ३१.१२.२०२१ असून केंद्रीय परवाना अधिकारी तथा पदावधित अधिकारी, अन्न व सुरक्षा मानके प्राधिकरण, पश्चिम विभाग ,मुंबई यांनी मंजूर केलेला असल्याने तो रद्द तथा निलंबित करण्याचे अधिकार केंद्रीय परवाना अधिकारी तथा पदावधीत अधिकारी, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, पश्चिम विभाग, मुंबई यांनाच आहेत.

(३) सह आयुक्त (दक्षता), अन्न व औषध प्रशासन यांच्या चौकशी अहवालानुसार अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ मधील कलम ३२ अन्वये संबंधित पदावधीत अधिकारी यांना विहित प्रक्रियेनंतर एखाद्या अन्न आस्थापनेचा परवाना निलंबित करण्याचे प्राधिकार आहेत. तसेच, अन्न, सुरक्षा व मानदे (परवाना व नोंदणी) नियमन, २०११ मधील तरतुदींनुसार केवळ परवाना प्राधिकारी यांना परवाना निलंबनाचे अधिकार आहेत. मे.वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, पांगरी, ता.परळी, जि.बीड या आस्थापनेला केंद्रीय परवाना प्राधिकारी यांचेकडून परवाना देण्यात आलेला

असल्यामुळे या नियमनाच्या तरतूदींनुसार सदर परवाना निलंबनाचे अधिकार हे केवळ पदावधीत अधिकारी तथा केंद्रीय परवाना अधिकारी प्राधिकारी यांनाच आहेत. नसलेल्या अधिकाराचा वापर करुन व अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन सहायक आयुक्त (अन्न), बीड श्री.अ.ए.केरुरे यांनी केलेल्या बेकायदेशीर कृतीमुळे अन्न व औषध प्रशासनाची शिस्त व प्रतिमा यांना धक्का पोहोचला असल्याने श्री.केरुरे यांचेविरुध्द उचित शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी शासनास केली होती. सदर शिफारशीच्या अनुषंगाने श्री.केरुरे यांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक १६.०८.२०१८ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत असे आढळून आले की, सदर इव्हॅपोरेटर बॉडीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग हे Corrosion, erosion मुळे तसेच २००७ पासून बॉडी वापरात असल्याने कमकुवत झाल्याने तुटले. याबाबत कारखान्याचे भोगवटादार श्री.नामदेवराव आघाव यांचेवर कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ अ (२) (अ) च्या भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांचे न्यायालयात खटला (खटला क्र.२५६४/२०१७) दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथे नविन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत

**(२९) * १३४०५६ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करून पाटस या ठिकाणी नविन पोलीस स्टेशन सुरु करण्याची मागणी मा.लोकप्रतीनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्र. पशा-१ पाटस पो.स्टे. /१९१५३/२०१८, पुणे दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी देखील मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी पोलीस स्टेशन सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या पदनिर्मितीच्या दुस-या टप्यात पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण यांच्या अंतर्गत असलेल्या यवत पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन पाटस पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

पदांचा आढावा अद्यापपर्यंत पूर्ण न झाल्याने पदनिर्मितीच्या दुस-या टप्प्यास वित्त विभागाने अद्याप मान्यता दिलेली नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगर शाळा व महाविद्यालयांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये ड्रग्ज तसेच अंमली पदार्थांच्या व्यवसनामध्ये वाढ झाल्याबाबत

**(३०) * १२६५४० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये ड्रग्ज तसेच अंमली पदार्थांच्या व्यसनाचे प्रमाण वाढीस लागल्याचे दिसून येत आहे. तसेच अनेक विद्यार्थी एम.डी.,चरस, गांजा, एलएसडी सारख्या अंमली पदार्थांचा वापर करत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या व्यसनाचे शरीरावर दुष्परिणाम होत असुन यामुळे स्क्रिझोफेनिया, बायपोलर, डिसऑर्डर, ड्रिपेशन इत्यादी मानसिक आजार होण्याची शक्यता असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंमली पदार्थ विकणाऱ्या दलालांनी विद्यार्थ्यांना या व्यसनाची नुसतीच चटक लावली नसून या जाळ्यात इतर विद्यार्थ्यांनाही ओढण्यासाठी नशेबाज विद्यार्थ्यांचाही अतिशय शिताफीने वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांची विक्री करताना दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास बोरिवलीच्या एमएचबी कॉलनी पोलीसांनी तीन व्यक्तींना पकडले तर दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या वांद्रे युनिटनेही अशीच कारवाई करुन एकाला अटक करुन त्याच्याकडून लाखो रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला, तसेच सदर प्रकरणी फैजल शफिक शेख याला खार पोलिसांनी अटक केली असून चौकशी अंती शहर आणि उपनगरातील अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या २० तस्करांची माहिती मिळाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भांडुप (मुंबई) येथे अंमली पदार्थाची तस्करी करतांना अंमली पदार्थविरोधी कक्षाच्या घाटकोपर युनिट ने दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास केलेल्या कारवाईत रुपये १ लाख ८६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला असुन सदर प्रकरणी भांडुप पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच नवी मुंबईतील रबाळे पोलीसांनी घणसोली येथे नाकाबंदी दरम्यान एमएच-४३ ए-१८२५ या स्कोडा कारमधून रुपये २५ लाखाचा १५८ किलोचा गांजा दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अंमली पदार्थाच्या विक्रीसाठी विद्यार्थ्यांचा वापर करण्यावर प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अभिलेखावर विद्यार्थ्यांवर ताबा केसेस अथवा सेवनार्थी गुन्हे नाहीत.

(४) दिनांक ७.९.२०१८ रोजी इंदीरा नगर झोपडपट्टी, हॅपी होम सोसायटी लगत, बोरीवली पश्चिम, मुंबई या ठिकाणी २ किलो ५० ग्रॅम किमंत रु.२०,०००/- किमंतीचा गांजा हा अंमली पदार्थ इसम नामे मोसीन उर्फ चिंकू मेहमद्दीन शेख यास बेकायदेशीर रित्या स्वत:च्या कब्जात बाळगला म्हणून अटक करुन त्याचे विरुध्द एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे वि.स्था. गु.र.क्र. २९/२०१८ कलम ८(क), सह २० (ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक २३.०८.२०१८ रोजी गांवदेवी डोंगर अंधेरी पश्चिम, मुंबई या ठिकाणी ५८ ग्रॅम रु.१,१६,०००/- अंदाजे किमंतीचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ इसम नामे आसिफ इकबाल खान यास बेकायदेशीर रित्या स्वत:च्या कब्जात बाळगला म्हणून अटक करुन त्याचेविरुध्द बांद्रा युनिटने अपविक्र गुरक्र. ३७/२०१८ कलम ८ (क), सह २२ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक ३०.०९.२०१८ रोजी टेरेसा बी.एम.सी. मैदानाजवळ, हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई या ठिकाणी, ६८ ग्रॅम रुपये ३,४०,०००/- किंमतीचा कोकेन हा अंमली पदार्थ फैसल शफिक शेख वय २९ वर्षे, याने बेकायदेशीर रित्या स्वत:च्या कब्जात बाळगला म्हणून त्यास अटक करुन त्याचे विरुध्द खार पोलीस ठाणे वि.स्था. गु.र.क्र. १५२/२०१८ कलम ८ (क), सह २१ एन.डी.पी.एस. ॲक्ट. १९८५ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(५) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिटने दिनांक ०८ ऑगस्ट २०१८ रोजी भांडूप पोलीस ठाणेचे हद्दीत ९ किलो ३०० ग्रॅम गांजा कि. रु.१,८६,०००/-

हा अंमली पदार्थ विक्री कब्जात बाळगला म्हणून एकूण ६ पुरुष व २ महिला असे एकूण ८ आरोपींना अटक करुन त्याचेवर घाटकोपर युनिटने अंपविक्र गु.र.क्र. ३१/२०१८ कलम ८ (क), सह २०, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

दिनांक ०५.०८.२०१८ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील रबाळे पो.स्टे. येथे नाकाबंदी दरम्यान एकूण १५८ किलो वजनाचा गांजा जप्त केला असून सदरबाबत इसम नामे बाळुदत्तोबा वालमपल्लेव यांच्यावर रबाळे पो.स्टे. येथे गु.र.क्र. ३१७/२०१८ कलम ८ (क), २०, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(६) एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदविलेल्या वि.स्था. गु.र.क्र. २९/२०१८ संदर्भातील आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे व दोषारोपपत्र तयार करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट येथे नोंदविलेल्या गु.र.क्र. ३७/२०१८ संदर्भातील आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे व या प्रकरणाचा तपास पोलीस स्तरावर चालू आहे.

खार पोलीस ठाणे वि.स्था. गु.र.क्र. १५२/२०१८ संदर्भातील आरोपी यास दिनांक १७.१०.२०१८ रोजी जामिन मिळाला असून या प्रकरणाचा तपास पोलीस स्तरावर चालू आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिट येथे नोंदविलेल्या गु.र.क्र. ३१/२०१८ संदर्भात रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी दोषारोपपत्र तयार करण्यात आले असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील रबाळे पो.स्टे. येथे नोंदविलेल्या गु.र.क्र.३१७/२०१८ या प्रकरणाचा तपास पोलीस स्तरावर चालू आहे.

तथापि, राज्यात ड्रगचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जानेवारी २०१५ पासून ड्रग्ज फ्रि कॅम्पस हा उपक्रम राबून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सावाच्या वेळी अंमली पदार्थ कक्षाच्यावतीने जनजागृती

कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेगळया एन.जी.ओ. संस्थाच्या वतीने व्यसनाधीन इसमांवर/ मुलांवर उपचार करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणुन पंधरवडा साजरा करण्यात येतो. सदर पंधरवडयादरम्यान अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे. तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग इत्यादी कार्यक्रम घेण्यात येत आहे.

(७) विलंब झालेला नाही.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील ज्युपिटर मिल, अपोलो मिल व मेटल बॉक्स या मिलच्या भूखंडावर बांधण्यात आलेले वाहनतळ महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत

**(३१) * १२६५७७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील सेनापती बापट मार्गावरील मुंबई टेक्सटाईल्स मिल, ना. म. जोशी मार्गावरील ज्युपिटर मिल आणि अपोलो मिल, पांडुरंग मार्गावरील मेटल बॉक्स या मिलच्या भूखंडावर विकास नियमावली ५८ अंतर्गत बांधण्यात आलेले वाहनतळ मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात मिळण्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने लोअर परळ, मुंबई येथील विविध मिलमध्ये विकास नियंत्रण नियमावली ५८ अंतर्गत बांधण्यात आलेले वाहनतळ मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) लोअर परेल येथील ज्युपिटर मिल, अपोलो मिल व मेटल बॉक्स या भूखंडावरील विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत बांधण्यात आलेल्या वाहनतळाचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करण्यात आले आहे.

तसेच लोअर परेल येथील मुंबई टेक्सटाईल्स मिल या भूखंडावरील विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत बांधण्यात आलेल्या वाहनतळाचे काम पूर्ण झालेले आहे. विकासकाने सदर वाहनतळ हस्तांतरण करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर केला असून त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कुरळप (ता.वाळवा, जि.सांगली) येथील मिनाई प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील ८ विद्यार्थीनींवर शाळेच्या संस्थापकाने केलेला अत्याचार

**(३२) * १२९९३८ श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरळप (ता.वाळवा, जि.सांगली) येथील मिनाई प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील ८ विद्यार्थीनींचे शाळेच्या संस्थापकानेच लैंगिक शोषण केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कुरळप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्रमशाळेतील स्वच्छतागृहे व खोल्यांची तपासणी संबंधीत अधिकाऱ्यांनी केली होती काय, त्यात काय आढळून आले होते,

(४) असल्यास, या संस्थापकाने यापूर्वी केलेल्या गुन्ह्यांची फेरचौकशी करुन त्यास कठोर शिक्षा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
सदर गुन्हा सांगली जिल्ह्यात घडलेला आहे. दाखल गुन्ह्यातील एकूण ०८ अल्पवयीन पिडीतांपैकी ०५ वर लैंगिक अत्याचार व ०३ वर अश्लील वर्तन केल्याचे अद्यापपर्यंत निष्पन्न झाले आहे.
(३) सदर ठिकाणची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपी क्र. १ हा ज्या ठिकाणी वास्तव्य करीत होता, त्याचे राहते खोलीतून कॅमेरा, व्हिडीओ रेकॉर्डर, संगणक, बेडशिट, पिलो कव्हर, टॉवेल, निकर, निरोधचे पाकीट, मेमरी कार्ड अशा आक्षेपार्ह वस्तू मिळून आलेने त्या सविस्तर पंचनाम्याने जप्त करणेत आलेल्या आहेत.
(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून कुरळप पोलीस ठाणे, ता.वाळवा, जि.सांगली येथे गु.र.नं.८२/२०१८ भा.दं.वि. कलम ३७६(२)(एन), ३७६(सी), ३७६(३), ३५४-अ, ५०६, ३ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१) (डब्ल्यू), ३(२)(व्ही), ३(२)(व्ही), ३(२)(व्हीए) बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ६,१० प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्यात आली. सदरचे दोन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.सद्यस्थितीत सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द-गोवंडी एम पूर्व विभागात रुग्णालयांची संख्या कमी असल्याबाबत

**(३३) * १२८११४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईस्थित मानखुर्द-गोवंडी एम-पूर्व विभागात देवनार क्षेपणभूमि आणि वाहनांच्या रहदारीमुळे प्रदूषण होऊन विविध आजारांमध्ये वाढ झाल्याने रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सदर विभागात रुग्णालयांची संख्या कमी असल्यामुळे विभागातील रुग्णांना उपचार घेण्यास त्रास होत असल्याची बाब दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागामध्ये शताब्दी हे एकच शासकीय रुग्णालय असून विभागामध्ये रुग्णांना उपचार घेण्यास त्रास होत असून या विभागात अतिरिक्त रुग्णालयांची आवश्यकता असल्याने तशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत कोणती उपाययोजन करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) "दवाखाने रुग्णालये अपुरी" अशा आशयाचे वृत्त दिनांक ०३.१०.२०१८ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

(२) व (३) सदर परिसरात पंडित मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालय हे २१० रुग्णशय्येचे द्विस्तरीय रुग्णालय असून सदर रुग्णालयामार्फत खालील सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात:-

- अपघात विभाग
- वैद्यकीय विभाग
- शल्यचिकित्सा विभाग
- बालरुग्ण विभाग
- नाक कान घसा विभाग
- नेत्र विभाग
- अस्थिव्यंग विभाग
- प्रसूती व स्त्रीरोग शास्त्र विभाग
- प्रसुती पश्चात विभाग
- मनोविकार विभाग
- दंत चिकित्सा विभाग
- अतिदक्षता विभाग
- औषध भंडार व दवाखाना
- पॅथॉलॉजी विभाग (२ सत्रामध्ये)
- क्ष-किरण विभाग
- ईसीजी
- सोनोग्राफी (१ सत्र)

- २डी इको (दर शनिवारी)
- एम.आर.आय. स्कॅन (१ सत्र)
- एचआयव्ही चाचणी
- जीन्स एक्सपर्ट (१ सत्र)

सदर रुग्णालयाचे विस्तारीकरण करुन ५८० रुग्णशय्येचे रुग्णालय महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनांवर काम करणारे सुमारे ५ हजार बांधकाम कामगार नोंदणी न झाल्याने कामगार कल्याण योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(३४) * १२७०२३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांवर काम करणाऱ्या सुमारे ५ हजार बांधकाम कामगारांची नोंदणी न केल्याने हे कामगार कल्याण योजनांपासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने याकरिता विकासक व कंत्राटदार यांना जबाबदार धरले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश शासनाला दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांची नोंदणी न करणाऱ्या विकासक व कंत्राटदारावर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांवर काम करणाऱ्या कामगारांना कल्याण योजनांचा लाभ घेता यावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०१८ अखेर बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण(म्हाडा), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व झोपडपट्टी प्राधिकरण मिळून कार्यरत असलेल्या ५३२७० बांधकाम कामगारापैकी ४८४८८ बांधकाम कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करण्यात आली असून उर्वरीत ४७८२ बांधकाम कामगारांची नोंदणी प्रलंबित होती.

(२) होय हे खरे आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२६.०९.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने बांधकाम सुरु करण्यापुर्वी विकासक / कंत्राटदार यांनी त्यांचेकडील बांधकाम कामगार महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत करणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांवर काम करणा-या कामगारापैकी मंडळाकडे नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येत आहे. तसेच अनोंदीत बांधकाम कामगारांना नोंदणी नंतर विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये बांधकाम परवान्यास परवानगी मिळणेबाबत

**(३५) * १२७२४८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील सहयाद्री पर्वत रांगा अंतर्गत इको सेन्सिटिव्ह झोनमधील विकास परवानगीबाबतची प्रकरणे सहाय्यक संचालक नगररचना विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून याबाबत

राज्यमंत्री, नगरविकास यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक नगररचना कार्यालय, पुणे यांचे कार्यालयाकडे इको-सेन्सिटिव्ह झोन मधील विकास परवानगीबाबत केलेल्या प्रस्तावावर वेळेत कार्यवाही होत नसल्याबाबतच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये बांधकाम परवानगी त्वरित देणेबाबत व कोल्हापूर येथील सहाय्यक संचालक नगर रचना पद भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सदर विषयाबाबत दि. ११/०९/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) होय.

कोल्हापूर जिल्हयातील सहयाद्री पर्वत रांगा अंतर्गत इको सेन्सिटिव्ह झोनमधील दोन जमिनीच्या विकास प्रस्तावांमध्ये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे अधिनस्त कार्यालयास अनुक्रमे दि.१३/०३/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे व दि. ०२/०८/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे मार्गदर्शन केले आहे. आज रोजी इको सेन्सिटीव्ह झोनमधील विकास परवानगी प्रकरणी मार्गदर्शन मिळण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे प्रलंबित नाही.

(३) इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये बांधकाम परवानगी त्वरित देणेबाबत बैठकीच्या वेळी संबधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सहायक संचालक,नगर रचना या संवर्गातील पद भरती प्रक्रिया सुरु असून सदर संवर्गातील अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कोल्हापूर जिल्हा नगर रचना शाखा कार्यालयामधील सहायक संचालक,नगर रचना हे रिक्त पद भरणेची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे. सध्यस्थितीत अतिरिक्त कार्यभार श्री. वि.लिं.कोटी, नगर रचनाकार, कोल्हापूर शाखा कार्यालय यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगांव (जि.जळगाव) शहरातील कारखान्यात घातक रसायनांपासून बनावट देशी दारू तयार करण्यात येत असल्याबाबत

**(३६) * १३३२९६ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घातक रसायनांपासून बनावट देशी दारु तयार करून जळगांव जिल्हयात विक्री करणारा चाळीसगांव शहरातील कारखाना जळगांव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उद्‌ध्वस्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सुमारे तीन लाख ४१ हजार ८५६ रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बनावट देशी दारू तयार करुन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला प्रोव्हीबिशन गु.र.नं.६०४५/२०१८ मु.प्रो. ॲ.क.६५(ई) सह भा.दं.वि.कलम ३२८, ४२०, ४६५, ३४, प्रमाणे दि.०५/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात एकुण ४ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ३,४१,८५६/- रूपये किंमतीची बनावट दारू व बनावट दारू तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## रामगढ जोगेश्वरी पूर्व वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील खंडित सेवा रस्त्याच्या कामाबाबत

**(३७) * १२६७४७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामगढ जोगेश्वरी पूर्व वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील ५१७/००० ते ५२६/२६० या टप्प्यातील मिसिंग सर्व्हिस रोडच्या कामात ओंकार वेन्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस फायदा करून देण्यासाठी मोठया प्रमाणात गैरप्रकार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तात्काळ चौकशी करून संबधितांवर कारवाई करण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधींनी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बांद्रा कुर्ला कॉम्लेक्स, मुंबई यांना दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी व मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिंनाक ८ ऑगस्ट, २०१८ दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर मिसिंग लेन्थ रस्त्याच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) प्रश्नाधिन बाबीमधील नमूद पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सा.क्र. ५१७/००० ते ५१७/२६० दरम्यान २६० मी. लांबीमधील खंडीत सेवारस्त्याशी संबंधित आहे. सदर ठिकाणी मे. ओंकार वेन्चर प्रा. लिमिटेड यांनी अस्तितत्वातील खडक/टेकडीचा जो भाग सेवारस्त्याचा भाग आहे तो जमिनीच्या स्तरापर्यंत तोडून खडकाचा भाग खोदून सेवारस्त्याचा भूभाग कोणताही वाद निर्माण न करता अथवा न्यायालयाकडून कोणतीही स्थगिती

आदेश न घेता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करावा तसेच यासाठी येणारा खर्च अर्जदाराने स्वत: करणे आवश्यक राहील व याबाबत शासनाकडून कोणतीही आर्थिक भरपाई मिळणार नाही, या अटीवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये परवानगी दिली होती. पश्चिम द्रुतगती महामार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये पाच वर्षासाठी हस्तांतरीत झाल्यानंतर सदर महामार्गावरील सा.क्र. ५१७/००० ते ५१७/२६० दरम्यान २६० मी. लांबीमधील खंडीत सेवारस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणाने सदरहू सेवा रस्त्याचे काम मेसर्स करगवाल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दि.०२/०४/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देऊन सुरू करण्यात आले आहे. तथापि, मा.लोकप्रतिनिधींनी दि.०२/०८/२०१८ रोजी प्राधिकरणाकडे सदर प्रकरणी चौकशी विनंती केल्याने प्राधिकरणाने सदर कामाची वस्तुस्थिती तपासून सेवारस्त्याच्या एकूण २६० मी लांबीपैकी २०० मी लांबी मे. ओंकार वेन्चर प्रा. लि. यांचे भूखंडालगत असून उर्वरीत ६० मी. लांबीत त्यांची भूखंडाची हद्द लगत आढळत नसल्यामुळे २६० मी. लांबीपैकी २०० मी लांबीच्या सेवारस्त्याच्या कामाची रक्कम मे. ओंकार वेन्चर प्रा.लि. यांनी प्राधिकरणाकडे जमा केल्यावर काम हाती घेण्याचे व उर्वरीत ६० मी लांबीच्या सेवारस्त्याचे काम नियुक्त कंत्राटदारामार्फत करण्याबाबतचे आदेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिले आहे. सद्यस्थितीत सदर कामाचे कंत्राटदारास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

-----------------

## हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) येथे ई.डी. ने जप्त केलेल्या मिळकतीवर तीन इमारती बांधून त्यामधील सदनिका ग्राहकांना विकून ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(३८) * १३१८६९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील सर्व्हे नंबर २२०, हिस्सा नंबर १ व ५/५ मधील ०-८३ या ई.डी. ने जप्त केलेल्या मिळकतीवर तीन इमारती बांधून त्यामधील सदनिका ग्राहकांना विकून ग्राहकांची व शासनाची फसवणूक झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये निदर्शनास आले असतांना गुन्हयाचा तपास अतिशय संथ गतीने सुरु असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मिळकतीवर हिंदवी स्वराज्य कॉर्पोरेशन प्रा.लि. कंपनी व त्या कंपनीचे डायरेक्टर याने नमुद मिळकत ही ई.डी. ने जप्त केलेली आहे हे माहीत असतानाही सदर मिळकतीवर तीन इमारती बांधून त्यामधील सदनिका ग्राहकांना विकून ग्राहकांची व शासनाची फसवणूक केल्याच्या तक्रारीवरून हिंजवडी पोलीस स्टेशन येथे ६ आरोपी, साहील रिअॅल्टर्स व हिंदवी स्वराज कॉर्पोरेशन प्रा.लि. यांचेविरूद्ध गुन्हा क्र. ३०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ सह लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असतांना अद्यापही सदर गुन्हा तपासावर असल्याने या गुन्हाचा तपास संथ गतीने सुरु असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाची व ग्राहकांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी असिस्टंट डायरेक्टर , सक्त वसुली संचालनालय यांच्या फिर्यादीवरून ८ आरोपींविरूद्ध हिंजवडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४२३, १२०(ब) सह प्रिव्हेंशन ऑफ करप्शन अॅक्ट १९८८ चे कलम १३ अन्वये दिनांक १३.१.२०१८ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास संथ गतीने सुरू आहे हे खरे नाही.

सदर गुन्हयाचा तपास दिनांक २६.९.२०१८ रोजी पावेतो सहायक पोलीस आयुक्त, चतुश्रृंगी विभाग पुणे शहर यांनी केला असून , पिंपरी चिंचवड हे वेगळे पोलीस आयुक्तालय निर्माण झाल्याने सदर गुन्हयाचा तपास सहायक

पोलीस आयुक्त, वाकड विभाग पिंपरी चिंचवड यांचेकडे दिनांक २७.९.२०१८ रोजी पासून देण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात महत्वपुर्ण दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत व सक्षीदारांचे जाबजबाब नोंदविण्यात आले आहेत. सर्व संबंधित कार्यालयाकडे गुन्हयाचे अनुषंगाने कागदपत्रे मिळण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.सदरची कागदपत्रे प्राप्त करून घेऊन आरोपीताविरोधात जास्तीत जास्त पुरावा गोळा करीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही तालुक्यातील (जि.चंद्रपूर) जिल्हापरिषद सदस्य यांनी रेतीघाट बंद न करण्यासाठी कंत्राटदाराकडून लाच घेतल्याबाबत

**(३९) * १२७४६३ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदेवाही तालुक्यातील (जि.चंद्रपूर) जिल्हापरिषद सदस्य यांना रेतीघाट बंद न करण्यासाठी कंत्राटदाराकडून रुपये २ लाखांची लाच घेतांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने याप्रकरणी चौकशी करून गुन्हा दाखल केला आहे काय,
(३) असल्यास, संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) पो. स्टे. सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथे अप क्र. ५१५/१८ कलम ७ (अ) १२ लाचलुचपत प्रतिबंध कायदा (सुधारीत) अधिनियम, २०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा नगरपरिषदेस दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत प्राप्त निधी अखर्चित असल्याबाबत

**(४०) * १२८३७७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगरपरिषदेस दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१६-१७ करिता रुपये १.५० कोटी व सन २०१७-१८ करिता रुपये ४.८० कोटी रुपयांचा प्राप्त निधी नगरपरिषदेच्या हलगर्जीपणामुळे अद्याप अखर्चित असल्याची बाब दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत प्राप्त निधीचे विकासात्मक नियोजन न झाल्याने बुलढाणा शहरातील दलित वस्त्यांचा विकास प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे विकासात्मक नियोजन करण्यास विलंब व हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

• बुलढाणा नगरपरिषदेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत (पूर्वीचे नाव दलित वस्ती सुधार योजना) सन २०१६-१७ मध्ये रुपये ४,५८,५१,०००/- इतका निधी मंजूर झाला होता. त्यापैकी रुपये ३,६९,९०,०००/- इतका निधी खर्च झाला असून आजमितीस रुपये ८८,६१,०००/- इतका निधी अखर्चित आहे. तर सन २०१७-१८ करीता रुपये ५,६०,००,०००/- इतका निधी प्राप्त झाला असून हा पूर्ण निधी अखर्चित आहे.

(२) व (३) • सन २०१६-१७ मध्ये रुपये ४,२४,५२,०००/- इतक्या रक्कमेची ७६ कामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ७५ कामे पूर्ण झाली असून या कामांची रुपये ३,६९,९०,०००/- एवढी रक्कम प्रदान झाली असून मोजमापे नोंदवून व अंतिम मुल्यांकन करुन उर्वरित रुपये ४९,६५,०००/- इतकी रक्कम

प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे. या रक्कमा प्रदान झाल्यावर सन २०१६-१७ चा रुपये ३३,९९,०००/- इतका निधी अखर्चित राहील, जो मार्च, २०१९ अखेर खर्च होणे आवश्यक आहे. त्यापैकी रुपये ४.९७ लक्ष एवढ्या रक्कमेचे १ काम मंजूर झाले असून ते तातडीने पूर्ण करण्यात येणार आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

• सन २०१७-१८ साठी रुपये ५,६०,००,०००/- इतका निधी प्राप्त झाला असला तरी त्याहून अधिक रक्कमेच्या म्हणजेच रुपये ८.३६ कोटी रक्कमेच्या कामांना तांत्रिक मंजूरी घेण्यात आली आहे. या १३३ कामांपैकी कोणती कामे सन २०१७-१८ च्या प्राप्त निधीतून करावयाची याबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

• सदर निर्णय लवकर घेण्यास व प्राप्त झालेला निधी विहित कालावधीत खर्च करण्यासाठी योग्य ते नियोजन करण्याबाबत नगरपरिषदेस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त आणि खासगी इमारती, बीआयटी चाळी, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत येणा-या इमारती व जुन्या चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(४१) * १२६५५० श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त आणि खासगी इमारती, बीआयटी चाळी, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत येणा-या इमारती तसेच म्हाडा अंतर्गत येणा-या जुन्या चाळी इत्यादींच्या पुनर्विकासाला गती मिळावी यासाठी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विधिमंडळ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय.

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त आणि बिगर उपकरप्राप्त इमारती, बीआयटी चाळी, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत येणाऱ्या इमारती तसेच म्हाडाशी संबंधित इमारतींशी निगडीत समस्यांसदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनास सुचना करण्याकरिता या विभागाच्या क्र.विमंका-२०१६/प्र.क्र.१४२/दूवपू-१, दि.२९.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ८ विधानमंडळ सदस्यांची समिती गठित करण्यात आली आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) सदर अहवालाच्या अनुषंगाने म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये दुरूस्ती करण्याचे व त्याचबरोबर विकास नियंत्रण नियमावली ३३(५), ३३(७), ३३(९) मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा फुले नगर (कुलाबा, मुंबई) येथील झोपडपट्टीतील १५० कुटुंबांना पर्यायी जागा देण्याबाबत

**(४२) * १२८८०० श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले नगर (कुलाबा) येथील झोपडपट्यांवर केलेल्या कारवाईमध्ये १५० कुटुंबांना अद्याप पर्यायी जागा उपलब्ध न झाल्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (कुलाबा) यांनी मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांना दिनांक २३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर यांच्या अहवालानुसार, मनोरा आमदार निवास शेजारील भूकर क्र.१५०-अ हा राज्य शासनाच्या मालकीचा आहे. सदर भूखंडावरील अतिक्रमणे महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ५०(३) अन्वये निष्कासित करण्याबाबत महसूल व वन विभागाने दि.९.३.२०१० अन्वये कळविले. त्यानुसार सदर झोपडीधारकांचे शासनाच्या जागेवरील बांधकाम अनधिकृत ठरवून सदर अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. सदर भूखंड हा गणनाकृत झोपडपट्टी किंवा घोषित गलिच्छ वस्ती नाही. महाराष्ट्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या तरतूदी सदर जागेस लागू नाहीत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ५० (३) अन्वये निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली असून सदर जागेवरील झोपडीधारकांना पुनर्वसनाचा लाभ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडकोच्या प्रशासन, लेखा, कार्मिक, अभियंता, नियोजन, अतिक्रमण या विभागांत जातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविल्याबाबत

**(४३) * १२८५१९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या प्रशासन, लेखा, कार्मिक, अभियंता, नियोजन, अतिक्रमण या विभागात जातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारपद मिळविण्यासाठी अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करणारे सिडकोचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी डॉ. मोहन निनावे यांच्यासह सिडकोतील ४२ अधिकारी, अभियंता आणि वास्तुविशारद यातील १४ जणांवर सिडको प्रशासनाने कारवाई केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बोगस दाखले देऊन शासनाची फसवणूक करणाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) व (३) श्री. निनावे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको यांची " हलबा " या अनुसूचित जमाती प्रवर्गातून दि.१५.१.१९९६ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, जात पडताळणी समिती, नागपूर यांनी श्री.निनावे यांचा "हलबा" या अनुसूचित जमातीचा दावा दि.१५.२.२०१८ रोजीच्या आदेशानुसार अवैध ठरवला होता. समितीच्या सदर आदेशाच्या विरुध्द वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी यांनी मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयासमोर अपिल दाखल केले होते परंतु मा.न्यायालयाने सदर अपिल फेटाळल्याने श्री. निनावे,वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको यांच्या सेवा दि.७.९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये सिडको महामंडळाने संपुष्टात आणल्या आहेत.

तसेच महामंडळात कार्यरत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या ८२ कर्मचाऱ्यांपैकी ६७ कर्मचाऱ्यांनी महामंडळाकडे संबंधीत जात पडताळणी समितीने निर्गमीत केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत. उर्वरित १५ कर्मचाऱ्यांना एक महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि.१९.०९.२०१८ व दि.१२.१०.२०१८ रोजी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील खापा नगरपरिषद अंतर्गत लावण्यात आलेल्या एलईडी दिवे गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४४) * १३१३७५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील खापा नगरपरिषद अंतर्गत १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून प्रभाग क्रमांक २ मध्ये एलईडी दिवे लावण्यासाठी १४ कोटी २३ हजार रूपये निधी मंजूर करण्यात आला असता ते काम वरद असोसिएट नागपूर यांना देण्यात आले असून करारनाम्याप्रमाणे एलईडी दिवे न लावता या कामात मोठया प्रमाणात गैरप्रकार करून लाखो रूपयांची शासनाची फसवणूक करण्यात आली असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितांवर कारवाई करण्यात यावी अशा प्रकारचे पुराव्यानिशी लेखी निवेदन प्रधान सचिव, नगरविकास, मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीचा तपशिल काय आहे, त्यानूसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे,

• या कामासाठी मंजूर निधी १४ कोटी २३ हजार एवढा नसून १४ लाख २३ हजार एवढा आहे.

• अशा आशयाची तक्रार नगरपरिषदेच्या काही सन्माननीय सदस्यांनी सन २०१७ मध्येच शासनाकडे / जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असून तेव्हाच ही बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय, असे निवेदन सन्माननीय नगरपरिषद सदस्यांनी दिले आहे.
(३) व (४) शासकिय तंत्रनिकेतन, नागपूर यांच्याकडून याप्रकरणी तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आले आहे. त्यामध्ये क्लॅम्प ६ मि.मी. ऐवजी ३ ते ४ मि.मी. बसविल्याचे नमूद केल्याने क्लॅम्पची किंमत ५० % कमी करुन उर्वरित रक्कम कंत्राटदाराला प्रदान करण्यात आली आहे.

तक्रारींची चौकशी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून सुरु आहे. सदर चौकशी पूर्ण होईपर्यंत कंत्राटदारास सुरक्षा अनामत रक्कम प्रदान न करण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंडणगड येथे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथे स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत

**(४५) * १३१८७४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंडणगड तालुक्यातील (जि. रत्नागिरी) नागरिकांना स्वतंत्र न्यायालय नसल्याने न्याय प्राप्तीसाठी ८० ते ९० किमी अंतरावरील दापोली तालुक्यात जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंडणगड हे तालुक्याचे ठिकाण असूनही न्यायासाठी स्थानिकांना दूर जावे लागत असल्याने मंडणगड येथे स्वतंत्र न्यायालय होण्यासाठी मंजूरी मिळावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री विधी व न्याय विभाग यांना दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास पत्राद्‌वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून मंडणगड येथे स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत कोणता निर्णय घेतला व तदनुसार न्यायालय होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१३.७.२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांना व दि.१८.७.२०१८ रोजी मा.राज्यमंत्री, विधि व न्याय विभाग यांना पत्र दिली आहेत.
(३) राज्यातील न्यायालय स्थापनेबाबत मा.उच्च न्यायालयातील न्यायालय स्थापना समिती निर्णय घेत असते. त्यामुळे या प्रकरणी प्राप्त झालेली पत्रे दि. २१.९.२०१८ व दि. २५.९.२०१८ रोजी मा.उच्च न्यायालयास आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहेत.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि. ४.१०.२०१८ रोजी दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) मंडणगड स्थापनेबाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांचे मत / अभिप्राय, प्रलंबित प्रकरणाची संख्या आणि सोयी सुविधांबाबतची माहिती मागविली आहे. या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाचा प्रस्ताव अप्राप्त आहे.

तसेच सध्या मंडणगड येथे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या शनिवारी ग्रामन्यायालय कार्यरत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ३२ महानगरपालिका-नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या सुमारे १७८ कोटी रुपयांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आल्याबाबत

**(४६) * १३१३३८ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३२ महानगरपालिका-नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या सुमारे १७८ कोटी रुपयांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने उक्त स्थानिक स्वराज्य संस्थांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या कामांना सुरुवात केली आहे काय,

(३) असल्यास, किती कालावधीत हे प्रकल्प पूर्ण होण्याचे नियोजित आहे,

(४) अदयाप, या प्रकल्पांच्या कामांना सुरुवात झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी ३२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे १७५ कोटी रुपयांच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी दिली आहे.

तसेच, राज्यातील एकूण २४५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास आतापर्यंत मंजूरी दिली आहे.

(२) मान्यता दिलेल्या एकूण २४५ घनकचरा व्यवस्थापनाच्या सविस्तर प्रकल्पांची अंमलबजावणी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सुरू आहे.

(३) हे सर्व प्रकल्प ऑक्टोबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील कळवा परिसरातील तिसरा उड्डाणपुल नवी मुंबईच्या हद्दीतील पटनी मैदानाजवळ उतरविण्याबाबत

**(४७) * १२६७६८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव**

**(गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कळवा परिसरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी बांधण्यात येत असलेला तिसरा उड्डाणपुल छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे न उतरविता नवी मुंबईच्या हद्दीतील पटनी मैदानाजवळ उतरविण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, एमएमआरडीए तसेच आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर मागणीचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

तथापि, कळवा खाडीवरील तिसऱ्या पूलाचे ठाणे-बेलापूर रस्त्यावरील उतरणचे काम बहुतांशी पुर्ण झाले असल्यामुळे सदर पूलाचा विस्तार पुढे तांत्रिकदृष्ट्या करता येणार नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये सुमारे साडेआठ हजार इमारतीमध्ये एफएसआयचे उल्लंघन तसेच विनापरवाना वाढीव बांधकाम करुन नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याबाबत

**(४८) * १२७३९० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये सुमारे साडेआठ हजार इमारतीमध्ये एफएसआयचे उल्लंघन तसेच विनापरवाना वाढीव बांधकाम करुन नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये १९५५ रहिवासी इमारतीमध्ये एफएसआयचे उल्लंघन तर ३२३२ इमारतीमध्ये फेरबदल व वाढीव बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ मध्ये वा त्या दरम्यान प्रशासनाने काचेच्या इमारतींवर बंदी आणण्यासाठी कठोर नियमावली तयार केली परंतु त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच सदर इमारतींच्या विकासकावर एमआरटीपी कायद्यानुसार कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील १८,२८३ अनधिकृत / वाढीव बांधकामे / अनधिकृत माळ्यांना महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजाविण्यात आल्या असून त्यापैकी ९३७ अनधिकृत / वाढीव बांधकामे संबंधितांनी काढून टाकली आहेत. तसेच ४,३४७ अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेने निष्कासित केली आहेत. उर्वरित १२,९९९ अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेमार्फत कायदेशिररित्या निष्कासित करण्यात येणार आहेत.

(३) व (४) मुंबईमध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या काचेच्या इमारतींकरीता अग्निसुरक्षा उपाययोजना तयार करण्यात आल्या असून दिनांक २८.०८.२०१३ रोजी महानगरपालिकेमार्फत परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

तसेच अस्तित्वात असणाऱ्या इमारतींच्या अग्निसुरक्षेकरीता महानगरपालिकेमार्फत दिनांक २३.०९.२०१६ रोजी परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

मुंबई अग्निशमन दलाच्या नामनिर्देशित अधिकाऱ्यांमार्फत सदर इमारतींची नियमित कालावधीत तपासणी करण्यात येऊन त्यामध्ये काही अनियमितता आढळून आल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जी संरक्षण उपाययोजना अधिनियम, २०१६ अन्वये कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत चंद्रभागा नदीचे शुध्दीकरण करणेबाबत

**(४९) * १३१२२७ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीच्या शुध्दीकरणासाठी नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत शासनाने पहिल्या टप्प्याचा आराखडा निश्चित केला असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर येथील चंद्रभागा नदी ते सोलापूर जिल्ह्याची वरदायीनी असणाऱ्या उजनी धरणापर्यंतच्या नदीचे शुध्दीकरण होणार असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेतील संपूर्ण नदीकाठच्या गावात तेथील प्रशासनाच्या माध्यमातून सांडपाणी मैला शुध्दीकरण प्रकल्प राबविला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नमामी चंद्रभागा अभियानातंर्गत समाविष्ट कामाची व्याप्ती मोठी असल्याने कामाचे प्राथम्य विचारात घेऊन सदर अभियानाची अंमलबजावणी खालील ४ टप्प्यात करण्याचा निर्णय विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प संनियंत्रण समितीच्या दिनांक २६/६/२०१८ च्या बैठकीत घेण्यात आला आहे.

टप्पा क्र.१ - उजनी धरणापासून पंढरपूर शहरापर्यंत

टप्पा क्र.२ -पुणे शहरापासून उजनी धरणापर्यंत

टप्पा क्र.३ - भिमाशंकर पासून पुणे शहरापर्यंत

टप्पा क्र.४ - पंढरपूर शहरापासून पुढे हळीपर्यंत

• सदर निर्णय नमामी चंद्रभागा प्राधिकरणाच्या मंजूरीच्या अधीन असून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत तो मंजूरीस्तव ठेवण्यात येणार आहे.

(२) अभियानातंर्गत असलेल्या कामांमध्ये या कामाचा समावेश करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर अभियानातंर्गत चंद्रभागा नदीच्या वरील भागातील भिमा नदीच्या उपनद्यांवरील नागरी वस्त्यांमधून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी यंत्रणा उभारणे व नागरी घनकचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे, असे उद्दिष्टे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार नागरी भागातील २ महानगरपालिका, १० नगरपालिका व ३ कॅन्टोनमेंट बोर्ड येथे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

१) बारामती, शिरुर व दौंड या ३ नगरपरिषदांचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

२) पंढरपूर व आळंदी या २ नगरपरिषदांचे प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

३) राजगुरुनगर व सासवड या २ नगरपरिषदांचे प्रकल्प अहवाल शासनाच्या विचाराधीन आहेत.

४) लोणावळा, तळेगाव दाभाडे व इंदापूर या ३ नगरपरिषदांचे प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

तसेच नदीकाठी असलेल्या ग्रामीण भागातही १० हजारावर अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीचे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प प्राथम्याने करण्याचे नियोजन आहे. सोलापूर व पुणे जिल्हयातील प्रत्येकी ५ ग्रामपंचायतीच्या सांडपाणी प्रकल्प व्यवस्थापनाची कामे यावर्षी हाती घेण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील माझगाव ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास प्रकल्प रद्द करण्यात आल्याबाबत

**(५०) * १३३५५३ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव, ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प गत १३ वर्षापासून प्रलंबित असल्याने सदर प्रकल्प मुंबई महानगरपालिकेने माहे मे, २०१८ च्या प्रथम आठवड्यात रद्द केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडवाडी येथील सदर प्रकल्पाकरीता बांधण्यात आलेले संक्रमण शिबिर १३ वर्षात अतिधोकादायक झाल्याने संक्रमण शिबिर कोसळल्यास स्थानिक रहिवाश्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहूल (चेंबूर) येथे स्थलांतरित करण्यात आलेल्या इमारत क्रमांक १५ व १६ येथील २२० रहिवाश्यांना ताडवाडी येथेच संक्रमण शिबिर बांधून देऊन सदर प्रकल्प म्हाडा अथवा महानगरपालिकेच्या माध्यमातून तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील माझगांव, ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासासाठी मे. ग्रेस अॅण्ड रबरवाला सिटी डेव्हलपर्स यांना दिनांक १६.०५.२००८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत इरादापत्र देण्यात आले होते.

परंतु सदर विकास प्रकल्पामध्ये विकासकाने लक्षणीय प्रगती न केल्याने इरादापत्र रद्द करण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत दिनांक ०३.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये विकासकास कळविण्यात आले आहे.

(२) सदर पुनर्वसन प्रकल्पाकरीता सन २००५ मध्ये इमारत क्रमांक १२ व सन २०११ मध्ये इमारत क्रमांक १३ए व १३बी अशा तळमजला + ४ स्वरुपाच्या संक्रमण शिबीराच्या ३ इमारती बांधण्यात आल्या होत्या.

इरादापत्र रद्द केल्याचे विकासकास कळविल्यानंतर सदर संक्रमण शिबीराच्या इमारतींचे संरचनात्मक सर्वेक्षण करण्याकरीता दिनांक १९.०६.२०१८ रोजी स्ट्रक्चरल इंजिनियर यांची नियुक्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानुसार संक्रमण शिबीराच्या इमारतीच्यादुरुस्तीचे अंदाज पत्रक / निविदा बनविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) व (४) ताडवाडी येथील अतिधोकादायक इमारत क्रमांक १५ व १६ मधील २२० रहिवाशांना माहूल येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

मे. स्ट्रक्टवेल कन्सल्टंट्स यांनी यापूर्वी सादर केलेल्या संरचनात्मक सर्वेक्षण अहवालानुसार सदर प्रकल्पातील इमारतींची दुरुस्ती सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका परीसरातील दरगांव येथे फेअर एक्सपोर्ट (इंडीया) प्रा.लि. हा खाजगी कत्तलखाना सुरु असल्याबाबत

**(५१) * १२९५८८ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीत दरगांव येथे गट क्र.२३२/२३३ या ठिकाणी फेअर एक्सपोर्ट (इंडीया) प्रा.लि. या नावाने खाजगी कत्तलखाना सुरु असून या कत्तलखान्यात मलनिस्सारण व सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याकरिता व्यवस्था नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने कत्तलखान्यासाठी शासनाकडून बांधकाम परवानगी घेतली आहे काय, बांधकाम परवानगीनुसार सदर बांधकाम करण्यात आले आहे काय तसेच सदर कंपनीने महानगरपालिकेकडून बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या खाजगी कत्तलखान्यात एस.पी.पी. प्लांट उपलब्ध नाही, ई.टी.पी. संचावर स्वीच मीटर लावण्यात आलेली नाहीत,

कत्तलखान्यासाठी नियमानुसार आवश्यक असलेली जागा उपलब्ध नसतानासुध्दा सदर कत्तलखान्याला प्रदुषण नियंत्रण विभागाकडून प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, अशा प्रकारे चुकीच्या मार्गाने प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, उक्त कत्तलखाना बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मालेगाव महानगरपालिका हद्दीतील फेअर एक्सपोर्ट (इंडीया) प्रा.लि. या खाजगी कत्तलखान्यात मलनिस्सारण व सांडपाणी विल्हेवाट लावण्याकरिता आवश्यक ती सयंत्रणा उभारण्यात आलेली आहे.

(२) 'ड' वर्ग महानगरपालिकांसाठी लागु असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार मालेगाव महानगरपालिकेने दि.०६/०४/२०१८ अन्वये बांधकाम परवानगी दिली आहे. तसेच, बांधकाम परवानगी नकाशानुसार कत्तलखान्याचे बांधकाम करण्यात आलेले आहे, असे मालेगाव महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, भुखंड धारकांनी अद्याप पुर्णत्वाचा दाखला मिळणेबाबत महानगरपालिकेकडे मागणी केली नसल्यामुळे त्यांना पुर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही.

(३) हे खरे नाही.

सदर कत्तलखान्यात मलनिस्सारण व सांडपाणी विल्हेवाट लावण्याकरिता ६०० घ.मी. प्रतिदिन क्षमतेची सयंत्रणा उभारलेली आहे.

तसेच, सदर कत्तलखान्यास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दि.१२/०३/२०१२ अन्वये, अटी/ शर्तीनुसार प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तेजस्विनी स्किम अंतर्गत बेस्ट प्रशासनास दिलेले ११ कोटी रुपये बस खरेदीच्या निर्णयाअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(५२) * १२८३०३ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तेजस्विनी स्किम अंतर्गत बेस्ट प्रशासनास बस खरेदीसाठी एकूण रुपये ११ कोटी दिले परंतु बस खरेदीबाबत निर्णय न झाल्याने उक्त निधी वर्षभरापासून बेस्टकडेच पडून असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार बेस्ट बस खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • बृहन्मुंबई शहरासाठी "तेजस्विनी बस सेवा चालविण्यासाठी महानगरपालिकांना अनुदाने" या योजनेंतर्गत रु.११.०० कोटी शासनाकडून वितरीत करण्यात आले आहेत.

• सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट) ही कार्यान्वयन यंत्रणा आहे.

• सदर योजनेच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार बसगाडयांचा प्रकार निश्चित करणे तसेच बसगाडयांची खरेदी करणे इत्यादीबाबतचे अधिकार "योजना अंमलबजावणी समिती" यांस आहेत. त्यानुसार उचित कार्यवाहीच्या सूचना बेस्ट प्रशासनास देण्यात आल्या आहेत.

-----------------

## चांदूर बाजार (जि.अमरावती) येथिल पो.स्टे.ठाणेदार यांनी गावातील शांतता व सुव्यवस्था भंग केल्याबाबत

**(५३) * १३०९७४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती चांदूर बाजार येथे दिनांक १० जुन, २०१८ रोजी वा त्यासुमारास बैलबाजारामध्ये नियमानुसार जनावरांची विक्री करण्यात आली व त्यांना बाजार समितीची पावती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी करणाऱ्या खरेदीदाराने ती जनावरे त्यांचे वाहनामध्ये भरली असता सदर खरेदीदाराने नियमानुसार जनावरे वाहनामध्ये न भरल्यामुळे सदर वाहन पो.स्टे.चांदूर बाजारच्या कर्मचाऱ्यांनी त्यावर कारवाई केली तसेच या प्रकरणाला जातीय वळण देऊन गोवंश हत्या प्रतिबंधात्मक कायद्यातंर्गत कारवाई केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणात बाजार समितीच्या कुठल्याही कर्मचाऱ्यांचा किंवा संचालक मंडळाचा कोणताही संबंध नसताना पो.स्टे.ठाणेदार यांनी त्यांना नोटीस पाठवून पो.स्टे.ला बोलावून त्यांना मानसिक त्रास देवून त्यांचा अवमान केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पो.स्टे.ठाणेदार हे शहरातील प्रतिष्ठीत नागरिकांना विनाकारण त्रास देऊन त्यांचा अवमान करित असल्यामुळे गावातील शांतता व सुव्यवस्था भंग होत असून सामान्य व प्रतिष्ठीत नागरिकांचे मानसिक खच्चीकरण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

चांदूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिनांक १० जून, २०१८ रोजी गुरांच्या बाजारामध्ये जनावरांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यात आले होते. त्याअनुषंगाने बाजार समितीने गुरांची खरेदी विक्री झाल्यानंतर ओळखपत्र व शपथपत्राच्या आधारे बाजार समितीची पावती देण्यात आली.

(२) अशंतः खरे आहे.

बाजार समितीची बाजार वेळ संपल्यानंतर जनावरे वाहतूकीकरीता वाहनात नियमानुसार न भरल्यामुळे दोन वाहनांवर पोलीस स्टेशन, चांदुर बाजार यांच्याकडून कार्यवाही करण्यात आली.

(३) व (४) पोलीस स्टेशन, चांदूर बाजार यांचेकडून बाजार समितीचे कर्मचारी व संचालक मंडळ यांना विचारपूस करण्याकरीता पोलीस स्टेशनमध्ये बोलविण्यात आले होते. त्यांच्याविरूध्द साक्षीपुरावे प्राप्त झाल्यानंतर त्यांचेवर अ.प.क्र.१४७/२०१८ नोंदविण्यात आला आहे. यात कम १२० (ब), ३४ भा.दं.वि.सह.कलम ५ (अ) गोवंश हत्या प्रतिबंधक अधि.११ (ई), (ड) पशुछळ प्रतिबंध, १९६०, ८३/१७७ मोटार वाहन कायदा, प्राणी मोटार वाहतूक कायदा १९७८ कलम ३८ (३) असे गुन्हे नोंदविण्यात आले. याअनुषंगाने बाजार समितीचे कर्मचारी व संचालक मंडळ सदस्य यांची चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(५) होय.

बाजार समितीतील या गुन्हाच्या अनुषंगाने दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच दोषी रोजंदारी कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचे बंद करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील आणिक पांजरापोळ जोड रस्त्याच्या कामामुळे (पूर्व मुक्त मार्ग) प्रकल्पबाधित झालेल्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५४) * १३०१३९ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्व मुक्त मार्गाकरीता सन २००७ ते २०१२ या कालावधीत बाधित झालेल्या चेंबूरच्या पांजरापोळ येथील २००० झोपडीधारकांचे एमएमआरडीएकडून अद्यापपर्यंत पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आणिक पांजरापोळ जोडरस्त्याचे (पूर्व मुक्त मार्ग) काम करतांना प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन केलेल्या व पुनर्वसन न झालेल्या

झोपडीधारकांना नविन शासन निर्णयानुसार न्याय मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाधित झालेल्या सदरहू झोपडीधारकांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी पासून एमएमआरडीसीएच्या कार्यालयाबाहेर उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू झोपडीधारकांचे सहा वर्षात पुनर्वसन न होण्याची कारणे काय आहेत व त्यांचे तातडीने पुनर्वसन करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) होय.

(३) हे अशंतः खरे आहे.

सदरहू झोपडीधारकांच्या प्रतिनिधींनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर एक दिवसाचे उपोषण केले होते.

(४) व (५) आणिक पांजरपोळ जोडरस्ता प्रकल्पाच्या मूळ सर्वेक्षणात नमूद असलेल्या, प्रकल्पाने बाधित झालेल्या आणि विहीत पध्दतीने पात्रता निश्चित झालेल्या सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पांतर्गत विवादग्रस्त झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र.९६७/२०१४ मध्ये दावा दाखल केलेल्या १० झोपडीधारकांचे पुनर्वसनाचे दावे खोटे असल्यामुळे सदर याचिका मा. उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. तरी ही स्थानिक लोकप्रतिनिधीची मागणी व झोपडी निष्कासनाचा दावा करणाऱ्या झोपडीधारकांची उपोषणे, मोर्चे इत्यादिद्वारे केलेल्या पुनर्वसनाच्या मागणीसंबंधी प्राधिकरणाच्या स्तरावर समिती गठित करुन प्राप्त झालेल्या माहितीची तपासणी करुन घेण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल प्राधिकरणाकडे सादर केला असून त्यामध्ये झोपडी निष्कासनाचा दावा असलेल्या झोपड्या

प्रकल्पाने बाधित आणि निष्कासित केल्या नसल्याचे निष्कर्ष नोंदविले आहेत. सदर अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## लोअर परळसह महालक्ष्मी, दादर, परळ, एल्फिन्सटन अशा दक्षिण मुंबईतील महत्वाच्या रेल्वे स्थानकाजवळील एकूण सहा पूल धोकादायक असल्याबाबत

**(५५) * १२७४३१ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पूल दुर्घटनेनंतर केलेल्या पाहणीअंती लोअर परळसह महालक्ष्मी, दादर, परळ, एल्फिस्टन अशा दक्षिण मुंबईतील महत्वाच्या रेल्वे स्थानकाजवळील रुळांवरुन जाणारे एकूण सहा पूल धोकादायक असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूकीस धोकादायक बनलेला लोअर परळ येथील पुल अचानक बंद केल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोअर परळ येथील रेल्वे स्थानकाजवळील रुळांवरुन जाणाऱ्या धोकादायक पुलाच्या पुनर्बांधणीबाबत तसेच मुंबईतील रेल्वे स्थानकाजवळील

रुळांवरुन जाणाऱ्या धोकादायक पुलांच्या पुनर्बांधणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) अंधेरी दुर्घटनेनंतर मध्य व पश्चिम रेल्वे प्रशासनामार्फत आय.आय.टी. (मुंबई) च्या तज्ञांकडून मुंबईतील रेल्वे पुलांची पाहणी करण्यात आली.

सदर अहवालामध्ये डिलाईल पूल (लोअर परेल) धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(२) आय.आय.टी. (मुंबई) च्या तज्ञांना डिलाईल पूल (लोअर परेल) धोकादायक असल्याचे प्रमाणीत केल्यामुळे पश्चिम रेल्वेमार्फत वाहतूक व पादचाऱ्यांकरीता सदर पूल बंद केल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३) रेल्वे रुळावरील धोकादायक पुलांच्या पुर्नबांधणीबाबत करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे:-

• डिलाईल पूल (लोअर परेल) या पुलाचे बांधकाम रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येणार आहे.

पुलाचे पोहोचमार्ग बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधण्यात येणार असून सदर कामाकरीता तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

• कर्नाक पुलाच्या पुनर्बांधणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

• हँकॉक पुलाच्या पुनर्बांधणीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आले आहे.

• गोखले पुलाच्या पादचारी पुलाचे पुनर्बांधकाम रेल्वे प्रशासनामार्फत सुरु आहे. त्याकरीता लागणारा निधी महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्रशासनास अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) येथील पालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना गत ५ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत

**(५६) * १२९६३९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील पालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना गत ५ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्यामुळे आर्थिकदृष्टया अडचणीत सापडलेल्या कर्मचाऱ्यांनी थकीत वेतनासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कळमनूरी पालिकेतील कर्मचाऱ्यांना वेतन व निवृत्त वेतनधारकांचे निवृत्ती वेतन नियमित व वेळेवर मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नगरपरिषद कर्मचारी दि.११.१०.२०१८ पासून दि.२४.१०.२०१८ पर्यंत थकित वेतन मिळण्याबाबत संपावर गेले होते, ही वस्तुस्थिती असल्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी अहवाल सादर केला आहे.

(२) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील २ महिन्यांचे व कार्यरत कर्मचाऱ्यांना मागील ३ महिन्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे.

* कळमनुरी नगरपरिषदेस सन २००९-१० ते सन २०१८-१९ या कालावधीतील वितरीत सहायक अनुदान आणि कर्मचाऱ्यांचे वेतन व सेवानिवृत्ती वेतनावर झालेला एकूण खर्च मिळता-जुळता दिसून येत असल्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरात बापट कॅम्प येथील पंपिंग स्टेशनचे काम रखडले असल्याबाबत

**(७७) * १२७५९३ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात बापट कॅम्प येथील पंपिंग स्टेशनचे काम केवळ पंपाअभावी थांबले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीनूसार सदरचे काम तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कोल्हापूर महानगरपालिकेने कळविल्यानुसार केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत "बापट कॅम्प येथील पंपिंग स्टेशन" उभारण्याचे काम सुरु आहे.

• सदर पंपिंग स्टेशन उभारण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत.

• पुढील ६ महिन्यात पंपिंग मशिनरी बसवून पंपिंग स्टेशन कार्यान्वित करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेदनकरवाडी (ता,खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद शाळेतील अल्पवयीन मुलींवर झालेला अत्याचार

**(५८) * १३४०७८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेदनकरवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद शाळेतील सहा ते सात अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याचे प्रकरण दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पवयीन विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण झाल्याच्या घटनेची सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांचे कार्यालयाचे अखत्यारीतील चाकण पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. ९०८/२०१८ भा.दं.वि. कलम ३५४ सह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा सन २०१२ चे कलम ८,१०,१२ प्रमाणे (०४) आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल गुन्ह्यातील आरोपी क्र.१ ला अटक करण्यात आली असून सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी क्र. ३ व ४ यांना मा. न्यायलयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. २ हा जामीनावर मुक्त आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदिरानगर व गोविंदनगर (नाशिक) येथे ई-शॉपी व ऑनलाईन फसवणुकीचे घडलेले प्रकार

**(५९) * १३३२४५ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरानगर (नाशिक) येथे आर्थिक गुंतवणुकीवर बँकेपेक्षा अधिक परतावा देण्याचे प्रलोभन दाखवून ई- शॉपीव्दारे कोट्यवधी रुपयांची फसवणुक केल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाच प्रकारे गोविंदनगर (नाशिक) येथील एका व्यक्तीला दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास एक्सप्रेस ऑटोनेशन कंपनीव्दारा ई -मेल करुन त्या कंपनीत नोकरीच्या आमिषाने दुरध्वनीवरुन मुलाखत घेवून रुपये पावणेतीन कोटीची फसवणुक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-शॉपी व ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार राज्यात सर्वत्र वाढत असून नागरिकांची त्यातून फसवणुक केली जात असल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून या सर्व घटनांप्रकारांची सायबर क्राईमव्दारा चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) आर्थिक गुंतवणुकीवर बँकेपेक्षा अधिक परतावा देण्याचे प्रलोभन दाखवून फिर्यादी व इतर यांची ३६,१५,४१९/- रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी इंदिरानगर पोलीस स्टेशन, नाशिक येथे गु.र.नं.२२७/२०१८ भा.दं.वि.कलम ४२०, ४०९, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे दि.२०/०८/२०१८ रोजी ७ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

नोकरीच्या आमिषाने फिर्यादी यांची फसवणुक केल्याप्रकरणी सायबर पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं.२९/२०१७ भा.दं.वि.कलम ४२०, ४६८, ४६५, ४७१, ३४ सह पासपोर्ट अधिनियम १९६७ कलम १२(अ) चे (अ) (ब) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (क) (ड) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यात २ परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

सप्टेंबर २०१८ पर्यंत राज्यात सायबर फसवणूकीचे एकूण १४७८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ट्रान्सफॉर्मिंग महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत जानेवारी २०१८ मध्ये राज्यातील नागरिकांची ऑनलाईन व्यवहारांद्वारे होणारी फसवणूक रोखण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये शिक्षण क्षेत्र व इतर क्षेत्रासाठी स्थानिक सायबर लॅबमार्फत जनजागृती करण्यात आली होती. तसेच मंत्रालयीन अधिकारी व प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी सायबर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## ठाणे मध्यवर्ती कारागृहातील दोघा कैद्यांनी अधिकाऱ्यांवर प्राणघातक हल्ला केल्याबाबत

**(६०) * १२८५७९ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे मध्यवर्ती कारागृहात नशेच्या कॅप्सुल गिळल्याप्रकरणी चौकशी सुरु झाल्यानंतर दोघा कैद्यांनी तोडफोड करुन तुरुंग अधिकाऱ्यांवरच प्राणघातक हल्ला केल्याची घटना दिनांक २५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तुरुंग अधिकाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या दोन्ही आरोपींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी तुरुंग अधिकारी यांच्यावर हल्ला करणा-या दोन्ही आरोपींवर ठाणेनगर पोलीस ठाणे येथे दिनांक २५.०८.२०१८ रोजी गुन्हा रजिस्टर नोंद क्रमांक आय १४२ नुसार कलम ३५३, ५०४ व ४२७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर प्रकरणी दिनांक १५.१०.२०१८ रोजी मा.न्यायालयामध्ये दोषारोप सादर झाले आहेत.

सदरील प्रकरणाचा न्यायालयीन क्रमांक आरसीसी २४९१/२०१८ असा असून सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गरीमा रियल इस्टेट कंपनी तसेच मैत्रेय कंपनी यांनी राज्यातील नागरीकांना दुप्पट रक्कम देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक

**(६१) * १३२०६६ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गरीमा रियल इस्टेट कंपनी तसेच मैत्रेय कंपनी यांनी राज्यातील नागरीकांना दुप्पट रक्कम देण्याचे आमिष दाखवून सुमारे १५० ते २०० कोटी रुपयांनी फसवणुक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नागरीकांना गुंतवलेल्या रक्कमेपैकी एकही पैसा परत करण्यात आला नसून हे पैसे गुंतवणूकदारांना परत करण्याबाबत व कंपनीविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबतची विनंती लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तद्नुसार गुंतवणूक केलेले पैसे परत मिळण्याबाबत व कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) गरीमा रियल इस्टेट कंपनीविरोधात फसवणूकीसंदर्भात राज्यातील ६ पोलीस घटकांमध्ये ८ गुन्हे दाखल आहेत. यापैकी १ गुन्हयात दोषारोपपत्र दाखल झाले असून उर्वरित गुन्हे तपासावर आहेत.

मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीविरोधात फसवणूकसंदर्भात राज्यातील २८ पोलीस घटकांमध्ये एकूण ३१ गुन्हे दाखल आहेत. यापैकी ८ गुन्हे न्यायप्रविष्ठ

असुन उर्वरित गुन्हे तपासावर आहेत. मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीच्या मालकीच्या ३०८ मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत जप्त करण्यात आल्या असून उर्वरित मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरणी उक्त कायद्यांतर्गत स्वतंत्र सक्षम प्राधिकारी (एमपीआयडी) नियुक्त करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे वडगाव बुद्रुक सर्व्हे क्रमांक ४३, ४७, ४८ ते ४९ येथील ४० हजार हेक्टर पुनर्वसित गावठाणावरील बीडीपी आरक्षण कायम ठेवण्याबाबत

**(६२) * १३२४४० श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वडगाव बुद्रुक येथील सर्व्हे क्रमांक ४३, ४७, ४८ व ४९ मधील सुमारे ४० हेक्टर वरील पुनर्वसित गावठाणावरील बीडीपी आरक्षण वगळण्यासाठी शासनाने महानगरपालिकेचा ठराव नामंजूर केला असतानाही पुणे महानगरपालिकेकडून दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास जाहिरात प्रसिद्ध करून हरकती-सूचना मागविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०१६ मधील आरक्षण उठविण्याचा ठराव मंजुरीकरिता पाठवून शासनाने जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सदर ठराव नामंजूर केला असल्याबाबत महानगरपालिकेला कळविले असतानाही सदर ४० हेक्टर जमिनीवरील बीडीपी आरक्षण उठविण्याबाबत महानगरपालिकेच्या वतीने हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची परवानगी नसतानाही पुणे महानगरपालिकेच्या वतीने जमीन मालक व अधिकारी यांनी आर्थिक संगनमताने सदर जमिनीवरील आरक्षण उठविल्याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानूसार संबंधित चौकशीतील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, पुणे वडगाव बुद्रुक सर्व्हे क्रमांक ४३, ४७, ४८ ते ४९ येथील ४० हजार हेक्टर पुनर्वसित गावठाणावरील बीडीपी आरक्षण कायम ठेवण्याबाबत शासनस्तरावर पुणे महानगरपालिकेला आदेश देण्यात येणार आहेत काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) पुणे वडगाव बु. येथील स.नं.४५ व ४६ पै. या मिळकती बीडीपी आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी यापुर्वी पुणे महानगरपालिकेने दि.१९/०५/२०१६ रोजीचे पत्रान्वये शासनास सादर केलेला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वयेचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाने दि.२६/०२/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नामंजूर केलेला आहे. यानंतर याव्यतिरिक्त याच गावातील स.क्र.४३, ४७, ४८ आणि ४९ या मिळकतीवरील बी.डी.पी. आरक्षण रद्द करून सदर मिळकती निवासी भागात समाविष्ट करणे करीता महापालिका सभा ठराव क्र.८, दि.२१/४/२०१६ मधील उप सुचना तसेच, मुख्य सभा ठराव क्र.९८७ दि.२९/१/२०१८ या अन्वये दिलेल्या मान्यते नुसार वर्तमानपत्रात व शासन राजपत्रात हरकती व सुचना मागविणेबाबत जाहिर प्रकटन पुणे मनपास्तरावर देण्यात आलेले आहे तथापि सदर प्रस्ताव अद्याप शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला नाही. सदर प्रस्ताव शासनास आवश्यक वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन महानगरपालिकेने सादर केल्यानंतर त्याबाबत मंजूरी / नामंजूरीबाबतचा निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहीम (मुंबई) येथील भुकर क्र. २५, २५अ मेहेर मंजिल या म्हाडाने संपादित केलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत

**(६३) * १३२६०६ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम (मुंबई) येथील भुकर क्र. २५ २५ अ मेहेर मंजिल व विश्वकर्मा भुवन इमारत पुनर्विकासासाठी म्हाडाने ताब्यात घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे तीस वर्षांचा कालावधी होऊनही पुनर्विकास न झाल्याने सदर इमारती अत्यंत धोकादायक बनल्या असून रहिवाशांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोकादायक इमारतींची दुरुस्ती अथवा पुनर्विकास करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
मेहेर मंजिल ही इमारत पुनर्विकासासाठी म्हाडाने भूसंपादन करून ताब्यात घेतली आहे,

विश्वकर्मा भूवन या भूखंडावरील दोन इमारतींपैकी एका इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी भूसंपादनास शासनाने मंजूरी दिली होती. परंतू सदर मालमत्तेच्या विश्वस्तांनी त्यांच्यामार्फत इमारतीच्या पुनर्बांधणी करण्याचा प्रस्ताव सादर केल्यामुळे शासनाने मंजूर केलेला प्रस्ताव रद्द करण्यात आला. तसेच सदर भूखंडावरील दुसरी इमारत सुस्थितीत जागेवर उभी आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) सद्यस्थितीत म्हाडाच्या भुसंपादित मालमत्तांच्या पुनर्विकासाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या न्यायालयीन प्रकरणी अशा भूसंपादित मालमत्तेबाबतच्या पुनर्विकासाची भूमिका म्हाडाने मा.उच्च न्यायालयात शपथपत्राद्वारे सादर केलेली आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार म्हाडाकडून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने महत्त्वाच्या नस्त्या नवी मुंबईतील शील प्रोजेक्ट लि. या कंपनीला जतन करण्याकरिता दिल्याबाबत

**(६४) * १२६५३१ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने शील प्रोजेक्ट लि. या कंपनी बरोबर करार करुन त्या करारातील अटी व शर्तीनुसार म्हाडाच्या ५ लाख ३४ हजार ४७६ फाईल्स जतन करण्यासाठी दिनांक १२ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास या कंपनीकडे दिल्या असताना त्या कंपनीला लागलेल्या आगीत जतन करण्यासाठी ठेवलेल्या फाईलपैकी १७९९० फाईल्स जळाल्या व ४७४९ फाईल्स पाण्याने भिजल्या या प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन या कंपनीवर कोणतीच कारवाई म्हाडाने केली नाही व या कंपनीला काळ्या यादीत टाकले नसून चौकशी समितीने केलेल्या शिफारशींकडे पूर्ण दुर्लक्ष केले असल्याची बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीशी केलेल्या करारामध्ये या सर्व कागदपत्रांचा विमा कंपनीने केला होता परंतु त्यामध्ये म्हाडाला सहभागी करुन घेतले नाही व करारातील अटी व शर्तींमध्ये विम्याचा उल्लेख हेतू:पुरस्सर कंपनीने केला नाही परंतु या कागदपत्रांचे नुकसान झाल्याने ४० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा विमा संबंधीत कंपनीने उतरविल्याने या विम्याचा आर्थिक फायदा फक्त कंपनीस होणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शील प्रोजेक्ट लि. या कंपनी बरोबर फाईल्स सुरक्षित ठेवण्याबाबत करार कधी करण्यात आला, तो म्हाडाच्या कोणत्या अधिकाऱ्यांनी केला व या कंपनी बरोबर केलेल्या करारात कोणकोणत्या अटी व शर्तींचा अंतर्भाव करण्यात आला होता व त्या अटी व शर्तींचे पालन कंपनीकडून करण्यात आले आहे काय तसेच कंपनीला लागलेल्या आगीत कोणकोणत्या फाईल्स जळाल्या आहेत,

(४) असल्यास, पोलीसांनी केलेल्या पंचनाम्यामध्ये सदर आग ही घातपात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून सदर आग शॉर्टसर्किटने लागली नसल्याचा महत्त्वपूर्ण अहवाल अग्नीशमन दलाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भस्मसात झालेल्या फाईल्सची पुनर्निमिती करण्याकरीता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(६) असल्यास, म्हाडातील जबाबदार अधिकाऱ्यांबाबत निर्माण झालेला संशय व कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्यास हेतूत: विलंब करणाऱ्या म्हाडातील संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरणाने दि.१९.०३.२०१८ च्या पत्रान्वये शील प्रोजेक्ट लि.कंपनीस आगीत जळालेल्या व भिजलेल्या संचिकांची सॉफ्टकॉपीसह दुय्यम प्रत विभागाच्या संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या प्रमाणीकरणासह कंपनीच्या खर्चाने देण्याबाबत कळविले आहे. तसेच, शील कंपनीची देयके यापुढे अदा करु नये अशा सुचनाही विभागीय मंडळांना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या दि.०७.०४.२०१८ च्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे,नवी मुंबई यांना तक्रार (FIR) नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(२) म्हाडाच्या अहवालानुसार यासंदर्भात म्हाडाकडे माहिती उपलब्ध नाही.

(३) म्हाडा व शील प्रोजेक्ट लि.कंपनीमध्ये दि.२०.१०.२०१२ रोजी श्री.दिलीप हळदे, सचिव/प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीने करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यानुसार म्हाडाकडील संचिका स्वरुपातील व सॉफ्ट कॉपीमध्ये असलेला अभिलेख जतन करण्याची जबाबदारी शिल कंपनीची आहे.

तथापि, महापे येथील शिल कंपनीकडे म्हाडाच्या विविध मंडळांच्या एकूण ५,३४,४७९ एवढ्या नस्त्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यापैकी एकूण १७९९० एवढ्या नस्त्या सदरहू आगीमध्ये नष्ट झाल्या असून ४७४९ एवढ्या नस्त्या पाण्याने भिजल्या आहेत.

(४) होय.

(५) म्हाडा प्राधिकरणाने दि.१९.०३.२०१८ च्या पत्रान्वये शील प्रोजेक्ट लि.कंपनीस, आगीत जळालेल्या व भिजलेल्या संचिकांची सॉफ्टकॉपीसह दुय्यम प्रत विभागाच्या संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या प्रमाणीकरणासह कंपनीच्या खर्चाने देण्याबाबत कळविले आहे.
(६) व (७) म्हाडा प्राधिकरणाच्या दि.०७.०४.२०१८ च्या पत्रान्वये FIR दाखल करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## मौजे कांजूर एल बी एस मार्ग येथील न.भू.क्र २८३, २८३/१ ह्या भूखंडावर बांधकाम करताना मे.कल्पतरू गार्डन विकासकांनी केलेली अनियमितता

**(६५) * १३३५७० श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कांजूर एल बी एस मार्ग येथील न.भू.क्र २८३, २८३ /१ ह्या भूखंडावर बांधकाम करताना मे.कल्पतरू गार्डन ह्या विकासकांनी महानगरपालिकेनुसार नागरिक सुविधा भूखंड (आरक्षित) मुख्य रस्त्यास पोहोच रास्ता जोडणे बंधनकारक असताना या ऐवजी मुंबई महानगरपालिकेचे प्रमुख अभियंता व कार्यकारी अभियंता (विकास नियोजन) उपनगरे ह्यांनी सदर भूखंड पूर्व दिशेस मुख्य रस्ता नसलेल्या ठिकाणी पोहोच रस्ता परवानगी देण्याचे प्रस्तावित करणे व विकासकाने ह्या भूखंडावरील नैसर्गिकरित्या वाहत असलेल्या मोठ्या नाल्याचे स्रोत कृत्रिमरित्या वळविल्याबाबत तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २२ जून, २०१८ व तत्पूर्वी मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता (विकास नियोजन) पूर्व उपनगरी कार्यकारी अभियंता (प ज वा) मुंबई महानगरपालिका घाटकोपर (पूर्व) यांच्याकडे दिनांक ३१ मार्च, २०१६ व सायंक एस विभाग महानगरपालिका यांच्याकडे ०१ एप्रिल, २०१६ आयुक्त महानगरपालिका यांचेकडे दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने व मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मे. कल्पतरू गार्डन यांच्यावर आणि नियमाबाह्य परवानगी देणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाचे स्थानिक लोकप्रतिनिधींची निवेदने बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहेत.

मौजे कांजूर येथील ७०४ चौ.मी. क्षेत्रफळाचा सुविधा भूखंड विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूदी अन्वये औद्योगिक जागेचे निवासी वाणिज्यीक (आय टू आर) असा बदल करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाला असून तो महानगरपालिकेच्या प्रस्तावित १८.३० मी. विकास नियोजन रस्त्यालगत आहे.

१८.३० मी. चा विकासनियोजन रस्ता विकासित होईपर्यंत लाल बहाद्दुर शास्त्री मार्गापासून सुविधा भूखंडापर्यंत जाण्याकरीता विकासकाच्या जागेमधील ६ मी. लांबीचा तात्पुरता हक्काचा पोहोचरस्ता (Temporary right of way) उपलब्ध राहिल या अटीसापेक्ष औद्योगिक ते वाणिज्यीक अशा बदलास महानगरपालिकेमार्फत परवानगी प्रदान करण्यात आली आहे.

(२) नाल्याच्या भौगोलीक व पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करुन महानगरपालिकेच्या पर्ज्यन्य जलवाहिन्या विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार सदर ठिकाणी अस्तित्वात असलेला नाला २.० मी. रुंद करुन भूखंडाच्या सीमेलगत वळविण्यात आलेला आहे.

पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यासाठी वळणाच्या ठिकाणी सदर नाल्याची रुंदी ३.० मी. ठेवण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाने दिलेल्या अभिप्रायामध्ये कोणतीही अनियमितता नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## 'पॅन कार्ड क्लब लिमिटेड' कंपनीत नागपूर शहरातील सुमारे दीड लाख गुंतवणूकदारांचे अडकलेले पैसे परत मिळण्याबाबत

**(६६) * १३३७२८ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरात हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या 'पॅन कार्ड क्लब लिमिटेड' कंपनीत नागपूर शहरातील सुमारे दीड लाख गुंतवणूकदारांचे पैसे अडकलेले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक दिवसांपासून गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करीत असून याबाबत पोलिसांनी किती जणांना अटक केली आहे,

(३) असल्यास, अटक करण्यात आलेल्या दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) तसेच गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नागपूर शहरात ९ तक्रारदारांनी त्यांची रु. ८,९५,९९०/- इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने गणेश पेठ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३०६/२०१८, भा.द.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ अन्वये दाखल असून आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर मार्फत तपास सुरु आहे.

याव्यतिरिक्त, मे. पॅनकार्ड क्लब लिमिटेड कंपनीविरोधात राज्यातील ५ पोलीस घटकांमध्ये गुन्हे दाखल असून सदर गुन्हे तपासाधिन आहेत.

(४) मे. पॅनकार्ड क्लब लिमिटेड कंपनीच्या ९१ स्थावर मालमत्ता सेबीने जप्त केल्या असून, सदर मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सेबीमार्फत सुरु आहे. सेबीने आजपावेतो, १५ मालमत्ता व ४ मोटारवाहने यांची विक्री केली असून त्यापोटी रु. ११५ कोटी जमा झाले आहेत.

सदर गुन्ह्यातील आरोपींच्या ६२ मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत संरक्षित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भांडूप (प.), मुंबई एलबीएस रोड गांधीनगर ते सोनापूर येथील रस्त्यालगत असलेले फूटपाथ व त्याखालील असलेले नाले बांधण्याच्या कामाबाबत

**(६७) * १२६५७६ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प.), मुंबई एलबीएस रोड गांधीनगर ते सोनापूर येथील रस्त्यालगत असलेले फूटपाथ व त्याखालील असलेले नाले बांधण्याचे साधारणपणे ३०० कोटी रुपयांचे कंत्राट बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मे.ए.पी.आय.बिटकॉन (जे.व्ही.) या कंपनीला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने सदरील फूटपाथचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून ते अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निकृष्ट बांधकामामुळे परिसरातील विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील निकृष्ट बांधकामाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भांडूप (प) येथील एल.बी.एस. रोडचे विक्रोळी स्टेशनरोड जंक्शन ते सोनापूर जंक्शन पर्यंतच्या कामांतर्गत रस्त्यालगतचे नाले, फुटपाथ, तुटलेल्या कॉंक्रिट पॅनलची पुनर्बांधणी याचा समावेश असणारे रु. ११३ कोटी रक्कमेचे कंत्राट मे. ए.पी.आय.बिटकॉन (जे.व्ही.) या कंपनीला देण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) ६.४० कि.मी. लांबीच्या सदर रस्त्याच्या कामाचा कालावधी २१ महिन्यांचा (मान्सून वगळून) आहे. सदर काम दिनांक २०.०४.२०१७ रोजी सुरु करण्यात आले असून दिनांक २०.०१.२०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सदर कामाकरीता वापरण्यात येणारी साधनसामुग्री महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत तपासणीकरीता पाठविण्यात येते. सदर काम हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या देखरेखेखाली करण्यात येत असून पावसाळ्यापूर्वी अर्धवट स्थितीत असलेले काम सुरक्षित स्थितीत आणले आहेत. तसेच सदर काम मानकाप्रमाणे असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

रस्ते, गटार व फुटपाथच्या कामावेळी संपूर्ण भाग बॅरिकेड्सने बंद करण्यात येतात. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा फलक बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लावण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील महाकाली दर्शन एस.आर.ए. योजनेतील पात्रता निश्चित करण्याकरीता होत असलेल्या विलंबाबाबत

**(६८) * १३३३०६ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील मौजे-गुंदवली न. भू.मा. क्र. ७८ व ७९ या खाजगी जमिनीवरील महाकाली दर्शन एस. आर.ए.सह. गृह. संस्थेस तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २००४ रोजी १९८० झोपड्पट्टीधारकांचे परि.-२ निर्गमित केले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परि.-२ मधील १११ पात्र झोपड्पट्टीधारकांविरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यानंतर निव्वळ प्रतिज्ञापत्राच्या आधारे सक्षम अधिकाऱ्याने चुकीची पात्रता निश्चित केली आहे असा ठपका ठेऊन उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) अंधेरी-२ यांनी दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी पात्र झोपड्पट्टीधारकांना अपात्र केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांनी दिलेल्या आदेशामध्ये अपात्र ठरलेल्या झोपड्पट्टीधारकांना शासन निर्णय क्र. झोपुधो-१००१/प्र.क्र. १२५/१४/झोपसु -१, दिनांक १६ मे, २०१५ मधील तरतुदीनुसार पात्रता निश्चित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज दाखल करण्याची मुभा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १११ झोपड्पट्टीधारकांनी विहित नमुन्यात माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अर्ज दाखल केले असून विकासक व उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) अंधेरी-२ यांच्या वादामध्ये सदर १११ लोकांच्या अर्जावर सुनावणी करून पात्रता निश्चित करण्याकरीता उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.) दिरंगाई करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर १११ लोकांच्या अर्जावर त्वरित निर्णय घेऊन विहित मुदतीमध्ये पात्रता निश्चित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाने दि.२७.०९.२०११ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार, अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) पश्चिम उपनगरे यांच्या दि.१५.०७.२०१७ च्या आदेशान्वये प्रकरणातील १११ झोपडीधारकांपैकी निव्वळ प्रतिज्ञापत्राच्या आधारे पात्र ठरलेल्या १०८ झोपडीधारकांची पात्रता उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी अंधेरी-२ यांच्या दि.१५.०३.२०१८ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आली आहे.

(३) होय. सक्षम प्राधिकाऱ्यांनी अशी मुभा दिली असल्याबाबत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांचा अहवाल आहे.

(४) हे खरे नाही.

त्या अनुषंगाने दि.१५.०३.२०१८ च्या आदेशानुसार अपात्र ठरलेल्या एकूण १०८ झोपडीधारकांपैकी (दि.१३.०४.२०१८ रोजी २३ झोपडीधारक, दि.०६.०६.२०१८ रोजी १८ झोपडीधारक, दि.२१.०७.२०१८ रोजी १५ झोपडीधारक, दि.२७.०७.२०१८ रोजी ५ झोपडीधारक व दि.०३.११.२०१८ रोजी ९ झोपडीधारक असे) एकूण ७० झोपडीधारकांनी नमुन्यात अर्ज सादर केले

असून अर्जासोबत सादर केलेल्या पुराव्याचे कागदपत्र संबंधित विभागाकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आले असल्याचा संबंधित उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) यांचा अहवाल आहे.

(५) सदर झोपडीधारकांची पात्रता पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधान्याने निश्चित करण्यात येईल, असा सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) येथील आशिष चौरे प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याबाबत

**(६९) * १३३३६९ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथील आशिष चौरे प्रकरणाची सत्यता पडताळणी करून, निष्पक्ष चौकशी होऊन सदर प्रकरणात दिशाभुल करणा-यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधीनी दिनांक ३० जुन, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणात गैरअर्जदार स्थानिक विधानसभा सदस्य व इतर दोन अशा तिघांविरुध्द दिनांक १/७/२०१८ रोजी एन.सी.क्र.२५६/१८ कलम ३२३, ५०४ भा.दं.वि. नोंद करण्यात आली आहे व अर्जदारास कोर्टातून दाद मागण्याची समज देण्यात आली आहे. सदर प्रकरणात घटनास्थळी हजर असलेले साक्षीदार व इतर साक्षीदार तपासण्यात आले आहेत. गैरअर्जदारांविरुध्द कोणताही पुरावा अद्याप मिळून आलेला नाही. अर्जदाराचा पुतण्या आशिष

चवरे याचे रक्त नमुना, घटनेदिवशी वापरलेले कपडे न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर येथे तपासणीकरिता पाठविण्यात आले असून अद्यापपर्यंत सी.एस.रिपोर्ट अप्राप्त आहे. सदर प्रकरणाबाबत तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गिरणी कामगारांना ३०० चौरस फुटाऐवजी ४०५ चौरस फुटाचे घर देण्याबाबत

**(७०) * १२९९९६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांसाठी बांधण्यात येणाऱ्या घरांसाठी विकासकांना शासनाने मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यानंतर गिरणी कामगारांना ३०० चौरस फूटाऐवजी ४०५ चौरस फुटांचे घर देण्याबाबत मा. मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली व शासकीय आदेशाचा मसुदाही हरकती व सूचनासाठी जारी करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत या प्रकरणी अंतिम आदेश काढण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ४०५ चौरस फूटाचे घर गिरणी कामगारांना देण्याबाबत आदेश काढण्यात होत असलेल्या विलंबामुळे अस्वस्थ झालेल्या गिरणी कामगार संघर्ष कृती समितीने पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गिरणी कामगारांना ४०५ चौरस फूटाचे घर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (५) शासन नगर विकास विभागाकडील दि.८ मे, २०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे बृहन्मुंबई विकास योजना-२०३४, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला सारभूत स्वरुपाचे फेरबदल वगळून शासनाने मंजूरी दिली असून सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावली दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे. तसेच शासनाकडील दि.२१/०९/२०१८ रोजीचे अधिसूचनेन्वये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील सारभूत स्वरुपाचे फेरबदलास मंजूरी देण्यात आली असून ते दि. १३/११/२०१८ पासून अंमलात आलेले आहेत.

त्यानुसार मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३५ मध्ये कापड गिरण्यांच्या जमिनीचे विकास/पुनर्विकासाची तरतुद असून अशा विकास किंवा पुनर्विकास योजनेत गिरण्यांच्या जमिनीवरील चाळी/इमारतींच्या निवासी किंवा निवासी तथा वाणिज्य चाळींच्या भोगवटाधारकांना प्रत्येकी ४०५ चौ.फूट कार्पेट क्षेत्राची (Carpet) पुनर्वसन सदनिका अनुज्ञेय असेल अशी तरतुद अंतर्भूत करण्यात आली आहे.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील मायानगर-अचानकनगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(७१) * १२६६१४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील मायानगर-अचानकनगर या वसाहतीचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसनाचे काम हाती घेतलेल्या 'हब टाऊन लिमिटेड' चे मालक श्री.विमल शहा या विकासकाने गत २२ वर्षांत या प्रकल्पांतर्गत केवळ ३ इमारती उभारल्या असून त्यात सुमारे २०३ स्थानिक रहिवाश्यांना घरे दिली असून अजूनही शेकडो रहिवाशी त्यांच्या हक्काच्या घरांपासून वंचित असल्याने आणि या रहिवाश्यांचे घरभाडे देखील या विकासकाने थकविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकासकावर आणि कलम १३(२) अन्वये विकासकावर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, राज्यमंत्री गृहनिर्माण यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि या प्रकरणातील दोषी विकासकावर व त्यास पाठीशी घालणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

घरभाडे थकीत असलेल्या पैकी ३४ सभासदांना भाड्याचे धनादेश दि.५.११.२०१८ रोजी स्वीकारले असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

प्रश्नांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विकासकाने एकूण ३ पुनर्वसन इमारती बांधल्या असून एकूण २०९ झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिका वाटप झालेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मायानगर अचानकनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या योजनेची प्रगती होत नसल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दि.०८.१२.२०१६ रोजी योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रदीर्घ विलंब झाला असल्याने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये विकासकाला नोटीस देण्यात आलेली होती. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दि.७.२.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाची

अंमलबजावणी झाली नसल्याची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार प्राप्त झाली होती. तद्नंतर दि. २४.१०.२०१८ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन

प्राधिकरणामध्ये झालेल्या सुनावणीमध्ये, उर्वरीत पुनर्वसन इमारतीचे काम तात्काळ सुरु करण्याचे व विकासकाने त्रैमासिक प्रगती अहवाल सादर करण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आदेश पारित केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने नेमलेल्या एकछत्री समितीने पोलीस पाटलांच्या मानधनामध्ये तुटपुंजी वाढ केल्याबाबत

**(७२) * १३११७४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस पाटलांचे अनुदान वाढविण्याकरिता राज्य शासनाने एकछत्री समिती नेमली असून समितीने पोलीस पाटलांच्या मानधनामध्ये तुटपुंजी वाढ केल्याने याबाबत एकछत्री समितीच्या अहवालातील अन्यायकारक शिफारशी रद्द करून पोलीस पाटलांचे मानधनात समाधानकारक वाढ करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) पोलीस पाटीलांचे मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पुणे येथील गार्नेट्स वे व्हेस्कोन लि. १९७/३, विमान नगर, नगररोड या प्रकल्पात अनधिकृत बांधकाम सुरू असल्याबाबत

**(७३) * १३४११५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील गार्नेट्स वे व्हेस्कोन लि. १९७/३, विमाननगर, नगररोड या बांधकाम प्रकल्पात अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पधारकाने महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या जागेवरही अनधिकृत बांधकाम सुरू केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने या प्रकल्पास नोटीस निर्गमित केली असून अद्यापही बांधकाम सुरू असून सदनिकांची विक्री करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे येथील गार्नेटस वे व्हेस्कोन लि. स.नं.१९७/३ विमाननगर नगर रोड या बांधकाम प्रकल्पात कोणतेही अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) • सर्व्हे नं. १९७/३ या मिळकतीमध्ये विकास आराखड्यानुसार कोणतेही आरक्षण नाही त्यामुळे आरक्षित जागेवर अनधिकृत बांधकाम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

• तसेच या मिळकतीतील मान्य लेआऊट मधील ॲमीनिटी स्पेसच्या जागेमध्ये सन १९८७ च्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार व्यापारी इमारतीचे नकाशे मंजूर असून त्याप्रमाणे मान्य नकाशानुसार संपूर्ण इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून झालेल्या बांधकामानुसार सदर इमारतीस भाग भोगवटापत्र देण्यात आलेले आहे.

(३) १९७/३ मधील ॲमीनिटी स्पेसच्या जागेवरील मिळकतीतील गाळेधारकांना जुलै, २०१७ मध्ये गाळ्यांच्या वापराबाबत पुणे महानगरपालिकेकडून नोटीस देण्यात आली असून नोटीसीच्या अनुषंगाने गाळेधारकांनी सादर केलेल्या खुलाशाबाबत तपासणी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात घरफोडी व चोरींच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(७४) * १२८३९८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा तालुक्यातील (जि.बुलढाणा) टाकरखेड व शेंबा येथे अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्री ८/१० ठिकाणी घरफोडी करुन सोन्याचांदीच्या दागिन्यांसह लाखो रुपयांचा ऐवज चोरी केल्याची घटना दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात वाढत्या चो-यांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या गुन्हयांचा तपास करुन चोरट्यांचा बंदोबस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरोधात पोलीस स्टेशन, बोराखेडी येथे अप.क्र. २६१/१८ भादंवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.
(२) बुलढाणा जिल्हयात सन २०१८ ऑक्टोबर पावेतो घरफोडी व चोरीचे गुन्हयांची मागील वर्षाचे समकाळाशी तुलना करता अनुक्रमे घरफोडी-३२ व चोरी-५६ गुन्हयांमध्ये अंशत: वाढ झालेली आहे.

सन २०१८ माहे ऑक्टोबर पावेतो चोरी व घरफोडीचे गुन्हयांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| हेड | दाखल | उघड |
|---|---|---|
| चोरी | १८९ | ३९ |
| घरफोडी | ६४४ | २७७ |

बुलढाणा जिल्हयात नागरिकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(३) चोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणून त्यास प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे

अ) डॉग स्कॉडला पाचारण करून आरोपींचा शोध घेण्यात आला.

ब) पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून माहीती घेण्यात आली.

क) सराफा व्यापारी असोसिएशन, बुलढाणा यांच्याशी पत्र व्यवहार करण्यात आला.

ड) घटनास्थळाचा डम डाटा काढण्यात आला तसेच ग्राम शेलापूर येथील ग्रामपंचायत बाहेरील सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये आरोपी आल्याचे दिसून आल्याने सदर फुटेज हस्तगत करण्यात आलेले आहे.

इ) आरोपींचा व मुद्देमालाचा कसोशीने शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घरांचे भाडे विकासकाने थकविल्याबाबत

**(७५) * १२८७८९ श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील १५०० घरे विकासकांनी घेवून त्यांचे ११८ कोटी रुपयांचे भाडे थकविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसुलीसाठी अधिका-यांनी विकासकांवर कारवाई करण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेला प्रस्ताव फेटाळल्याने विकासकांना म्हाडाकडून अभय मिळाले असल्याची बाब दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव फेटाळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विकासकामार्फत भाडे अदा करण्याबाबत दिरंगाई व अनियमितता दिसून आल्याने थकीत रकमेचा भरणा करणेबाबत तसेच थकीत रकमेचा भरणा न केल्यास म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ९५ अ (३) नुसार सक्तीची निष्कासन कारवाई करून संक्रमण गाळे ताब्यात घेण्यात येतील, अशा आशयाच्या नोटीस विकासकास देण्यात आल्या आहेत.

सदर नोटीसला प्रतिसाद न देणाऱ्या विकासकांविरूध्द थकित भाडे वसुलीची कारवाई सुरू केल्यानंतर व विकासक यांना काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) देण्यात आल्या असून माहे एप्रिल २०१६ ते ऑक्टोंबर, २०१८ या कालावधीतील रु. ४४१.९२ कोटी या थकबाकीपैकी आजमितीस एकूण रू.८३.६० कोटी इतकी रक्कम विकासकांकडून वसूल करण्यात आली असून उर्वरित रु. ३५९.१५ कोटी इतकी रक्कम विकासकांकडून वसूल करण्याबाबतची कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नगरपालिकेत झालेला गैरव्यवहार

**(७६) * १३३४०८ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नगरपालिकेत माहे मे, २०१७ ते मे, २०१८ या कालावधीत सुमारे २० लाख ८८ हजार ७०७ रुपयांचा गैरव्यवहार

झाल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेकडे विविध विभांगाकरीता कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याच्या मागणीनुसार तत्कालीन मुख्याधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांची जिजाऊ कृषी विकास सहकारी संस्थेकडून सेवा घेऊन नगरपालिकेमधील कामकाज केले परंतु या कर्मचाऱ्यांच्या मानधनापोटी अदा केलेल्या उक्त रक्कमेकरीता निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निविदा प्रक्रियाच राबविली गेली नसल्याने नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या कलम ९३ चे उल्लंघन झाले असून शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्याची मागणी नगरपालिकेच्या सभेत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार उक्त गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) अशा आशयाची तक्रार दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सर्वसाधारण विशेष सभेत विरोधी पक्षनेता, दापोली नगरपंचायत यांनी केल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

(२) दापोली नगरपंचायतीच्या अहवालानुसार नगरपंचायतीने माहे मे, २०१७ ते माहे मे, २०१८ या कालावधीत तातडीची बाब म्हणून अत्यावश्यक सेवेसाठी ३४ कर्मचाऱ्यांची सेवा तात्पुरत्या स्वरुपात घेतली, ही वस्तुस्थिती आहे.

• सदर कर्मचाऱ्यांचे वेतन, निविदा प्रसिध्द होऊन नवीन कर्मचारी आस्थापनेवर येईपर्यंत प्रचलित दराने अदा करण्यासंबंधी मंजूर ठरावानुसार अदा केले असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

• नगरपंचायतीच्या ठरावानुसार याबाबत दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या. परंतु, सदर निविदांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पुढील निविदा प्रक्रीया राबविण्यात आली नाही, असे नगरपंचायतीच्या अहवालात नमूद आहे.

(३), (४) व (५) नगरपंचायतीच्या दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सर्वसाधारण विशेष सभेत सदर प्रकरणाची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली, हे खरे आहे.

• सदरहू प्रकरणी प्रचलित अधिनियमातील तरतुदीनुसार तपासणी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सत्वर सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत क्षयरोगाच्या प्रमाणात १० टक्क्यांनी वाढ झाल्याबाबत

**(७७) * १३१३३९ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्षयरोग निर्मुलनासाठी विविध उपाययोजना केल्या जात असून मुंबई शहरात या आजारांवर नियंत्रण मिळविण्यात अपयश आले असुन या वर्षात क्षयरोगाचे प्रमाण १० टक्क्यांनी वाढल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील क्षयरोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी महानगरपालिकेच्या व शासनाच्या आरोग्य विभागामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) क्षयरोग निर्मुलनाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आहे.

तथापि, मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या, गर्दी, दाट वस्ती आणि घरामधील खेळत्या हवेचा अभाव इत्यादींमुळे क्षयरुग्णांची २-३ टक्के वाढ झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) क्षयरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालील सुविधा राबविल्या जात आहेत:-

- निदान सुविधा
- उपचार, एम.डी.आर. (Multi Drug Resistant) उपचार
- समुपदेशन व आहार
- प्रसार प्रतिबंधक उपाययोजना
- जनजागृती

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण-मोरा येथुन मुंबईकडे जाणारी एमएल कासीमी ही ६० प्रवासी असलेली बोट भर समुद्रात भरकटल्याबाबत

**(७८) * १२६८८९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण-मोरा येथुन मुंबईकडे जाणारी एमएल कासीमी ही ६० प्रवासी असलेली बोट भर समुद्रात बंद पडून भरकटल्याची घटना दिनांक २६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर मार्गावरील नादुरुस्त, कालबाह्य बोटीमधुन सुरु असलेल्या प्रवासी वाहतुकीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असल्याने त्यांच्या सुरक्षिततेसाठी अद्यापपर्यंत कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

दिनांक २६.०७.२०१८ रोजी कासिमी या बोटीच्या इंजिनमध्ये अचानक झालेल्या बिघाडामुळे बंद पडली असल्याचे आढळून आल्याने, पर्यायी बोटीने बोटीतील सर्व प्रवाशांना सुखरुप नवीन भाऊचा धक्का येथे आणण्यात आले. सदर बोटीचा सर्व्हे करण्यात आला असून सर्व्हे प्रमाणपत्राची मुदत दिनांक १५.०२.२०१९ पर्यन्त वैध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेतील शिक्षण समितीचे प्रशासन अधिकारी यांच्याकडून वैद्यकिय देयकात व गणवेश वाटपात केलेल्या अनियमिततेबाबत

**(७९) * १३३२४६ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेतील शिक्षण समितीच्या प्रशासन अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय देयकात तसेच शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटपात अनियमितता केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेश खरेदीत विशिष्ट मक्तेदार एजन्सीकडूनच गणवेश खरेदी करणे, कपड्याचा दर्जा अधिकृत लॅबकडून तपासणी केलेला नसणे तसेच शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांची वैद्यकिय देयके शिक्षण

उपसंचालकांकडून मंजूर होवून देखील कर्मचा-यांना अदा न करणे अशा अनेक बाबी निदर्शनास आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेकडून गणवेश वाटपात अनियमितता झालेली नाही. तथापि, वैद्यकीय देयके अदा करण्यास विलंब झालेला आहे, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) • समग्र शिक्षा अभियान अंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या दि.२८.६.२०१८ च्या परिपत्रकातील निर्देशानुसार, संबंधित शाळांच्या व्यवस्थापन समितीस्तरावर गणवेश खरेदी प्रक्रिया झालेली आहे.
• सदर परिपत्रकात शाळांनी गणवेश कापडाचा दर्जा अधिकृत लॅबमधून तपासणी करुन घेणेबाबत कोणत्याही सूचना नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.
• तथापि, गुणवत्तापुर्वक गणवेश वाटप प्रकरणात चौकशी करुन त्यामध्ये अनियमितता आढळून आल्यास संबंधित शाळा व्यवस्थापन समिती व संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करावी, अशा सुचना आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
• महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत सन २०१३ पासूनची सुमारे १३३ वैद्यकीय देयके पडताळणी अभावी प्रलंबित होती.
• त्यापैकी १८ देयके अदा करण्यात आली असून, ६९ देयके अदा करण्याची, तर उर्वरित ४६ देयके मान्यतेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
• वैद्यकीय देयके अदा करण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. एन.एच २११ वर वाहने अडवून लोकांची लुट होत असल्याबाबत

**(८०) * १३२०६७ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. एन.एच २११ वरील प्राथमिक आरोग्य केंद्र, पारगांव ते पारगांव शहर या ३ कि.मी च्या अंतरात वाहने अडवून ट्रक व बसेसमधील लोकांना लुटण्यात येत असल्याची तक्रार संबंधीत लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. महसुलमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात तेथील नागरीकांनी संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये तक्रारी करुनसूध्दा त्याकडे पोलिसांनी दुर्लक्ष केल्यामुळे तेथील नागरीकांत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

याबाबतची तक्रार महसुल विभागाकडुन किंवा संबंधित लोकप्रतिनिधी किंवा कोणत्याही नागरिकांकडुन पोलीस स्टेशन वाशी येथे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

ट्रक व बसेस मधील लोकांना लुटण्याबाबतची कोणतीही तक्रार पोलीस स्टेशन वाशी येथे कोणत्याही नागरिकांनी केलेली नाही. त्यामुळे नागरीकांमध्ये असंतोष पसरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, तक्रार प्राप्त झाली नसली तरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ या मार्गावर कोणतीही अनुसुचित घटना घडु नये त्यासाठी रात्रीच्यावेळी सतर्कपणे गस्त घालण्यात येत आहे. गस्तीच्या दरम्यान आतापर्यंत ८

संशयीत पारधी गुन्हेगारांना पकडुन त्यांच्यावर सी.आर.पी. सी. च्या कलम १०९ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील पेठांच्या भागातील जुने वाडे, चाळी व गावठाण यांच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर धोरण मंजूर करण्याबाबत

**(८१) * १३३२४२ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पेठांच्या भागातील जुने वाडे, चाळी, व गावठाण यांच्या पुनर्विकासासाठी पुणे महानगरपालिकेने क्लस्टर धोरण मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने १ हजार चौ.मि. क्षेत्रात एकत्रितपणे बांधकाम करण्याची व सहा मीटरपेक्षा कमी रुंद असलेल्या रस्त्यावर क्लस्टर धोरण मंजूरीसाठी शासनाने असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रात क्लस्टर धोरण मंजुरीतील क्षेत्र व रस्ता रुंदीकरणातील अटी पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता शिथिल करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) पुणे महानगरपालिका हद्दीतील दाट वस्ती क्षेत्राच्या नियोजनबद्ध विकासासाठी पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखड्यात समूह पुनर्विकास (क्लस्टर डेव्हलपमेंट) संकल्पना प्रस्तावित करण्यात येवुन सदर आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-२६ अन्वये दि. २८/०३/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला होता. सदर आराखडा विहीत कालावधीत पुणे महानगरपालिकेने शासनास सादर न केल्याने याबाबतची कार्यवाही करणेसाठी शासनाने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने

यामध्ये काही बदल करुन सदर विकास योजना शासनास मान्यतेसाठी सादर केलेली होती. सदर विकास योजनेस शासनाने दि.०५/०१/२०१७ रोजी मान्यता दिलेली असून त्यानंतर या विकास योजनेबाबत दि.०३/०७/२०१७ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार क्लस्टर डेव्हलपमेंट बाबतचा विनियम प्रलंबित ठेवलेला असून महानगरपालिकेने इम्पॅक्ट असेसमेंट रिपोर्ट सादर केल्यानंतर या विनियमास मान्यता देण्याचे अनुषंगाने पुढील कार्यवाही संकल्पित आहे. यानंतर पुणे महानगरपालिकेने दि.२४/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये क्रिसिल या संस्थेने तयार केलेला इम्पॅक्ट असेसमेंट रिपोर्ट सादर करुन क्लस्टर डेव्हलपमेंट बाबतचा विनियम मंजूर करणेस शासनास विनंती केली आहे. या प्रस्तावाबाबत शासनाने नगररचना संचालनालयाचा अहवाल अपेक्षिलेला असून सदर अहवाल प्राप्त करुन घेवुन याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर मेडिकल रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या बुलढाण्यातील रुग्णाचे झालेले अपहरण

**(८२) * १३३७३५ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील रुग्ण नागपूर मेडिकल रुग्णालयात उपचारासाठी आला असता एका बोगस डॉक्टरच्या टोळीने त्याला पळवून नेल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना पळवून नेणारी दलालांची टोळी पुन्हा एकदा सक्रिय झाली असून सुरक्षारक्षकांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरहू टोळीला पकडण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे ऑगस्ट २०१८ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील रुग्ण नागपूर मेडिकल रुग्णालयात उपचारासाठी आला असता त्यास एका बोगस डॉक्टरच्या टोळीने पळवून नेल्याची घटना घडलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील धान घोटाळा प्रकरण जलद गती न्यायालयात चालविण्याच्या मागणीस मंजूरी मिळण्यास होत असलेला विलंब

**(८३) * १३३३७० श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात सन २०१३-२०१४ तसेच २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात धान घोटाळा उघडकीस येऊन घोटाळ्याची प्रथम चौकशी करिता विशेष तपासणी समिती गठीत करण्यात आली होती व त्यानंतर चौकशी समितीने जिल्हा पणन अधिकारी यांना चौकशी अहवाल सादर करून भंडारा पोलिसात गुन्हा नोंदविला व तद्नंतर पोलिसांनी आरोपीवर कोणतीही कारवाई न केल्यामुळे सदर गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण शाखेकडे देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करून शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) भंडारा जिल्ह्यात धान खरेदी हंगाम २०१३-१४ या कालावधीत धान खरेदीमध्ये घोटाळ्याच्या अनुषंगाने विशेष तपासणी समिती गठीत करण्यात येऊन सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांचे तक्रारीवरून भंडारा पोलीस स्टेशन येथे

अप.क्र. १९८/२०१५ कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४,१२०(ब) भादंवि अन्वये गुन्हा दाखल केला. तद्नंतर सदर गुन्हयाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील एकूण ३६ आरोपीविरूद्ध मा. मुख्य न्याय दंडाधिकारी, न्यायालय भंडारा येथे दोषारोपपत्र दाखल केले असून मयत आरोपीविरूद्ध मा.न्यायालयात ॲबेटेड समरी दाखल केली आहे.

सदर गुन्हयातील २ आरोपी हे लोकसेवक आहेत किंवा कसे याबाबत दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन, मुंबई या कार्यालयाकडून माहीती अप्राप्त आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणे बाकी आहे. सदर माहीती प्राप्त होताच दोषारोपपत्र दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे. त्याचप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३(८) अन्वये गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील प्रकल्पबाधितांसाठी एम.एम.आर.डी.ए. कडून माहूल गाव परिसरात बांधलेल्या सदनिकांपैकी सुमारे तीनशे सदनिका परस्पर विकल्याबाबत

**(८४) * १३०१४४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील प्रकल्पबाधितांसाठी एम.एम.आर.डी.ए.कडून माहूल गाव परिसरात बांधलेल्या सदनिकांपैकी सुमारे तीनशे सदनिका महानगरपालिकेच्या एम पश्चिम विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून दलालांनी परस्पर विकल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार दोषी अधिकारी व दलालांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सदनिका रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, माहूलगाव येथे बांधण्यात आलेल्या प्रकल्प बाधितांच्या इमारतीस मूलभूत सोयी-सुविधा नसल्याने रहिवाशी या इमारतीमध्ये सदनिका घेण्यास तयार होत नाहीत, यासाठी या ठिकाणी सर्व प्रकारच्या मूलभूत सोयी-सुविधा किती दिवसात पुरविण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ३०० सदनिकांची परस्पर विक्री करण्यात आली ही बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, "पालिकेच्या घरांची परस्पर विक्री" अशा आशयाची बातमी दिनांक २४.०१.२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.
(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी मोहिमेंतर्गत तपासणी केली असता, १८ घुसखोरांनी प्रत्यक्ष घुसखोरी केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-
• घुसखोरी केलेल्या १८ सदनिका रिक्त करुन ताब्यात घेण्यात आल्या आहेत.
• बनावट कागदपत्रांच्या आधारे घुसखोरी केलेल्या इसमांविरुध्द आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे दिनांक १३.११.२०१७, २७.११.२०१७ व २१.१२.२०१७ रोजी तक्रारी दाखल करण्यात आल्या असून सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पाने बाधीत व धोकादायक इमारतींमधील कुटुंबांच्या पुनर्वसनाकरीता माहूल येथील सदनिकांचे वितरण करण्यात येते.

महानगरपालिकेने वितरित केलेल्या सुमारे १०,००० सदनिकांपैकी ५६१० सदनिकांमध्ये प्रत्यक्ष रहिवाशी वास्तव्य करीत आहेत.
(४) सद्य:स्थितीत या इमारतींतील रहिवाशांना महानगरपालिकेमार्फत खालील सेवा व सुविधा पुरविण्यात येत आहेत :-

• २४ तास पाणी पुरवठा करण्यात येतो.

• रिलायन्स एनर्जीतर्फे २४ तास वीज पुरवठा करण्यात येतो.

• किटक नियंत्रण विभागामार्फत नियमितपणे धुम्र फवारणी केली जाते.

• इमारतींच्या परिसरातील कचरा महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या संस्थेमार्फत नियमितपणे उचलण्यात येतो.

• सार्वजनिक आरोग्य केंद्र व दवाखाना सुरु करण्यात आला असून २ वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच, सदर परिसरात आवश्यकतेनुसार आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते.

• महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत नियमितपणे आरोग्य सर्वेक्षण करण्यात येत असून, सदर सर्वेक्षणात तापाचे रुग्ण आढळल्यास त्यांच्यावर वेळोवेळी उपचार केले जातात.

• सदर इमारतींमध्ये सदनिका वाटप केल्यानंतर आवश्यकतेनुसार किरकोळ दुरुस्तीची कामे वेळोवेळी करण्यात येतात.

• सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सदर इमारतींच्या सर्वंकष दुरुस्तीअंतर्गत स्थापत्य व विद्युत कामांकरीता महानगरपालिकेमार्फत रु. ३५ कोटींची तरतूद करण्यात आली असुन दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील सी.एस. क्र. ९३०, शीट आय.सी. क्र. २० या भूखंडावरील गौतमी माता नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(८५) * १२६७४८ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील सी.एस. क्र. ९३०, शीट आय.सी. क्र. २० या भूखंडावर असलेल्या गौतमी माता नगर झोपडपट्टीचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसनाचे काम प्रलंबित असतानाही मुंबईच्या प्रस्तावित विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेले 'गार्डन / पार्क' चे आरक्षण तातडीने रद्द करण्याची मागणी येथील झोपडपट्टीधारकांच्या नोंदणीकृत गौतमी माता नगर को.ऑप.हाऊसिंग सोसायटी लिमिटेडने मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री यांचेकडे

केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने या भूखंडावरील 'गार्डन /पार्क' चे आरक्षण तातडीने रद्द करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अशा स्वरुपाचे निवेदन गृहनिर्माण विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) बी.जी.खेर मार्ग, वरळी, मुंबई येथील प्रश्नांकित गौतमी माता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा भूभाग हा विकास नियोजन आराखड्यानुसार बगीचा तसेच मनोरंजन मैदानाकरिता पूर्वीपासूनच आरक्षित असून सीआरझेड-२ ने बाधित आहे.

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.११५२ / २००२ मध्ये दि.३१.०७.२००२ रोजी बगीचा, मनोरंजन मैदान पार्क, खेळाचे मैदान इ. वरील कोणत्याही नवीन योजनेस मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाशिवाय मान्यता देऊ नये, असे आदेश पारीत केले आहेत.

त्याअनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.२९.०३.२०१७ च्या पत्रान्वये विकासक व वास्तुविशारद तसेच गौतमी माता नगर सोसायटीस सदर प्रस्तावावर मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल व तो पर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत असल्याचे कळविले आहे.

सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत झोपडपट्टीयुक्त खुल्या आरक्षणासंदर्भात शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मा.उच्च न्यायालयात सदर प्रकरणी शपथपत्र दाखल करण्याच्या सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना देण्यात आल्या आहेत. मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा नगरपरिषदेने दिव्यांगांसाठी प्राप्त अनुदानाचे वाटप न केल्याबाबत

**(८६) * १२८४२९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगरपरिषदेने दिव्यांगांसाठी प्राप्त झालेले अनुदान अद्याप ३०० दिव्यांगांना वाटप केले नसल्याची बाब दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राप्त अनुदान वितरीत करणेबाबत पात्र व वंचित दिव्यांगांनी वारंवार मागणी करून देखील नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळे अद्यापही अनुदानाचे वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार दिव्यांगांसाठी प्राप्त असलेले अनुदान वाटपात हलगर्जीपणा करून दिव्यांगांना अनुदानापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • नगरपरिषदेने नागरी भागातील दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणकारी कामासाठी ३ टक्के रक्कम अर्थसंकल्पात राखून ठेवावयाची असून ही रक्कम शासन निर्णय दिनांक २८/१०/२०१५ मध्ये नमूद केलेल्या विविध बाबींच्या प्रयोजनार्थ खर्च करणे आवश्यक आहे. शासनाच्या दिनांक १०/५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर रक्कम ३ टक्केवरुन ५ टक्के इतकी वाढविण्यात आली आहे.

• सदर शासन निर्णयानुसार बुलढाणा नगरपरिषदेने सन २०१७-१८ मध्ये रुपये २५ लक्ष इतक्या निधीची तरतूद दिव्यांग व्यक्तीच्या कल्याणकारी कामासाठी अर्थसंकल्पात केली होती. प्रत्यक्षात रुपये ८,९७,२२८/- इतका निधी खर्च केला आहे.

• सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात यासाठी रुपये २५ लाख एवढी तरतूद (३ टक्के) नगरपरिषदेने केली होती. मे, २०१८ मध्ये शासनाने ही रक्कम ३ टक्केवरुन ५ टक्के केली असल्याने नगरपरिषदेस रु.१६,६६,६६६/- एवढी अधिकची तरतूद करावयाची आहे. नगरपरिषदेने चालू आर्थिक वर्षात रु.२.५० लक्ष एवढा निधी आतापर्यंत खर्च केला आहे.

• चालू आर्थिक वर्षात उर्वरित रुपये १६,६६,६६६/- इतक्या निधीची तरतूद करुन संपूर्ण निधी दिव्यांगाच्या कल्याणासाठी खर्च करण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करण्यास नगरपरिषद, बुलढाणा यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील १३३ अतिधोकादायक इमारतींवर कारवाई करण्याबाबत

**(८७) * १२८७९० श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एकूण ५५५ धोकादायक इमारतींपैकी महानगरपालिकेने आतापर्यंत १२१ इमारती पाडल्या असून ११२ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजूनही १३३ अतिधोकादायक इमारतींमध्ये रहिवासी राहत असून त्यांना इमारत रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले परंतु रहिवाशांना पर्याय नसल्यामुळे या इमारतींमध्येच ते राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने याची गंभीर दखल घेत मे अखेरपर्यंत या १३३ अतिधोकादायक इमारतींवर कारवाई पूर्ण करणार असल्याचा दावा केल्याचे दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती इमारतींवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे एप्रिल, २०१८ अखेर करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये, सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या ६८८ इमारती आढळून आल्या आहेत.

सदर इमारतींवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ अन्वये महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे :-

- १२१ इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत.
- ११२ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत.
- ३७ प्रकरणे तांत्रिक सल्लागार समितीकडे पाठविण्यात आली आहेत.
- ११८ इमारतींची जल व विद्‌युतजोडणी खंडीत करण्यात आली आहे.
- १३३ प्रकरणांमध्ये जल व विद्‌युतजोडणी खंडीत करण्याबाबतची कारवाई सुरु आहे.
- १६७ इमारतींची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेची मालकी असलेल्या इमारतीमधील भाडेकरु / रहिवासी / कर्मचारी यांचे महानगरपालिकेमार्फत इतरत्र स्थलांतर करण्यात येते.

खाजगी इमारतीमधील रहिवाशांच्या स्थलांतराची जबाबदारी खाजगी इमारत मालकाची आहे.

(३) १३३ अतिधोकादायक इमारतींवरील कारवाई पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिल्या होत्या.

(४) तद्‌नंतर माहे ऑक्टोबर, २०१८ अखेर ४२ इमारतींचे निष्कासन करण्यात आले असून ६२ इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. उर्वरित २९ इमारतींची जल विद्‌युत जोडणी खंडीत करणे व निष्कासनासाठी निविदा मागविणे इत्यादी कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील ४ हजार ७०६ धोकादायक इमारतींपैकी ९८ इमारती अतिधोकादायक असल्याबाबत

**(८८) * १२७११४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरामध्ये माहे जुलै-ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या पावसामुळे शहरातील ४ हजार ७०६ धोकादायक इमारतींपैकी ९८ इमारती अतिधोकादायक झाल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी व हजारो रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेने शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ नुसार सन २०१८-२०१९ मध्ये कार्यक्षेत्रातील एकूण ४७०५ इमारती धोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत. सदर इमारतींचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे:-

| वर्गीकरण | इमारतीचे प्रकार | एकूण इमारती |
|---|---|---|
| सी-१ | अतिधोकादायक व तात्काळ निष्कासीत करणे. | ९५ |
| सी-२ए | रिकामी करुन संरचनात्मक दुरूस्ती करणे. | ११४ |
| सी-२बी | रिकामी न करता संरचनात्मक दुरुस्ती करणे. | २२६० |
| सी-३ | किरकोळ दुरुस्ती. | २२३६ |
| एकूण धोकादायक इमारती | | ४७०५ |

• सी-१ प्रवर्गातील ९५ इमारतींपैकी ८४ इमारती रिक्त करण्यात आल्या असुन यापैकी २३ इमारती निष्कासीत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ६४ इमारती निष्कासित व ११ इमारती रिक्त करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

• सी-२ए, सी-२बी व सी-३ प्रवर्गातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेबाबत संबंधितांना सूचना दिल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• आतापर्यंत २५७० बाधितांना रेंटल स्कीममधील इमारतीमध्ये सदनिका भाडेतत्वावर उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(३) • ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अधिकृत धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात ॲपेंडीक्स-आर आहे.

• सदरची तरतूद ही दिनांक ०५.०७.२०१८ च्या अधिसुचनेन्वये ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त आयुष्यमान झालेल्या इमारतींकरिता लागू करण्यात आली आहे.

• त्याचप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण समुह विकास योजनेची नियमावली दिनांक ०५.०७.२०१७ च्या अधिसुचनेन्वये समाविष्ट करण्यात आली असून, सदर योजनेमध्ये ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या अधिकृत /अनाधिकृत इमारतींचा समावेश करण्यात आला आहे.

•ॲपेंडीक्स-आरमध्ये अधिक सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त आहे व याबाबत शासन स्तरावर छाननी सुरू आहे.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेत उद्यान विभागात वृक्ष गणनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(८९) * १३३२४७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेत उद्यान विभागात २५ लाख वृक्षगणनेच्या उद्दीष्टात परस्पर वाढ करुन अतिरिक्त सुमारे २३ लाख वृक्षांची मोजणी ठेकेदारामार्फत करुन घेण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधीच्या वृक्षांच्या मोजणीकरिता रुपये २ कोटी १३ लाख अदा केल्यानंतर अतिरिक्त २३ लाख वृक्षमोजणीसाठी साधारणत: रुपये २ कोटी अदा करताना उक्त बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.९३/२००९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांची गणना करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत अंदाजित २५ लक्ष वृक्ष गृहित धरुन निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

• सदर वृक्ष गणनेचे काम मक्तेदार यांनी दि.२०/१२/२०१७ रोजी पुर्ण केले असून, एकूण ४७,९५,२८१ इतक्या वृक्षांची गणना करण्यात आली आहे.

• याव्यतिरिक्त संरक्षण विभाग व पोलीस अकादमी परिसरातील वृक्ष गणनेचे काम गोपनीयतेच्या निर्बंधामुळे परवानगी अभावी प्रलंबित आहे.

• याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४९ लक्ष वृक्षांची गणना होण्याची शक्यता आहे.

• या कामासाठी मक्तेदार यांना रु.२,११,६५,०००/- इतक्या रकमेचे देयक महानगरपालिकेमार्फत प्रदान करण्यात आलेले आहे.

(३) याप्रकरणी महानगरपालिकेकडे तक्रार प्राप्त झाली नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा शहरासह कातराबाद, रुई, देवगांव, वडणेर, सोनगिरी व जामगांव परिसरात भूकंप सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(९०) * १३२०७४ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा शहरासह कातराबाद, रुई, देवगांव, वडणेर, सोनगिरी व जामगांव परिसरात दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास भुगर्भातून मोठा आवाज येऊन भूकंप सदृश्य परिस्थिती निर्माण झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संपूर्ण परिसराची भुवैज्ञानिक पाहणी करुन योग्य ती उपाययोजना करण्याबाबत संबंधित लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.भुकंप व पुनर्वसन मंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा शहरासह कातराबाद, रुई, देवगांव, वडणेर, सोनगिरी व जामगांव परिसरात भूकंप सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली नाही.
(२) होय.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.